अहवाल क्रमांक : १८५

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

**(२०२०-२०२१)**

**(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)**

**जालना जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

## सहावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक     मार्च, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२१

# पंचायती राज समिती

**(२०२०-२०२१)**

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**जालना जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

## सहावा अहवाल

# पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

१ श्री. संजय रायमुलकर, वि.स.स तथा समिती प्रमुख,

**सदस्य**

२ श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल, वि.स.स

३ श्री. कैलास बाळासाहेब पाटील (घाडगे) वि.स.स,

४ डॉ.राहूल वेदप्रकाश पाटील वि.स.स.

५ श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स.

६ श्री. संग्राम अरूणकाका जगताप, वि.स.स.

७ श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, वि.स.स.

८ श्री. शेखर गोविंदराव निकम, वि.स.स.

९ श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, वि.स.स.

१० श्री. माधवराव निवृत्तीराव जवळगावकर, वि.स.स.

११ श्रीमती प्रतिभा सुरेश धानोरकर, वि.स.स.

१२ श्री. हरीभाऊ किसनराव बागडे, वि.स.स.

१३ डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत, वि.स.स.

१४ डॉ. देवराव मादगुजी होळी, वि.स.स.

१५ श्री. कृष्णा धमाजी गजबे, वि.स.स.

१६ डॉ. संजय श्रीराम कुटे, वि.स.स.

१७ श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

१८ श्री. प्रशांत बंसीलाल बंब, वि.स.स.

१९ श्रीमती मेघना दिपक बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

२० श्री. किशोर गजानन जोरगेवार , वि.स.स.

२१ श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

२४ श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

२५ श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६ श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

२७ श्री. जयंत पाटील, वि.प.स.

२८ श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

२९ श्री. किशोर दराडे, वि.प.स.

३० श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. ह. वि.तामोरे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) *** रिक्त
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) *** रिक्त
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(२९) * श्री. किशोर दराडे, वि.प.स.
(३०) ** श्री. निलय नाईक, वि.प.स.
(३१) ** श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

***** श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

****** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प. स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

******* डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा ' समिती प्रमुख ' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सहावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तन्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला “Mini Legislature” सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशीलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुर्नविलोकन व सन २०१४-१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने जालना जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने जालना जिल्हा परिषदेस दिनांक २५, २६ व २७ सप्टेंबर, २०१८ रोजी भेट देऊन श्रीमती निमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ६ ऑगस्ट २०१९ व दिनांक १४ ऑगस्ट २०१९ रोजी जिल्हा परिषद, जालना संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीच्यावेळी श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग, श्री. श्यामलाल गोयल, अप्पर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. अनुकुमार, प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग, श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. राजेंद्र भागवत, सचिव, विधी व न्याय विभाग, एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. विनायक देशमुख, ए. आय. जी. एल. ॲन्ड ओ., श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, श्री.महेंद्र हजारी, सह सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. सं. द. सुर्यवंशी, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. दे. आ. गावडे, सह सचिव, ग्राम विकास विभाग, श्री.यु.ब.अजेटराव, उप सचिव, गृह विभाग, श्री. रमेश चव्हाण, उप सचिव, महसूल विभाग, श्री. विजय चौधरी, उप सचिव, (पस) कृषी व पणन विभाग, डॉ. एस. एस. पंचपोर, अवर सचिव, पदुम विभाग, श्री. गणेश पवार, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. ए. जी. गोटेकर, अवर सचिव, वित्त विभाग, श्री. पारस बोथरा, उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, जालना, श्री. व्ही. एम. रसाळ, सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, श्री. के. ए. चव्हाण, सहायक संचालक (लेखा), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद तसेच श्री. सु. रा. भोसले, संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या जालना परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ३ मार्च २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ३ मार्च २०२१.

**संजय रायमुलकर,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

# अनुक्रमणिका



| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | जालना जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसमवेत अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात. | . . |
| (२) | दोन | लेखा परीक्षण नियमावलीनुसार सन २०१३-१४ च्या वार्षिक लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवाल सर्वसाधारण सभेसमोर न ठेवल्याबाबत. | . . |
| (३) | तीन | जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शासन मान्यताप्राप्त महात्मा फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, मंठा, जिल्हा जालना. | . . |
| (४) | चार | वॉटर ग्रीडच्या कामामध्ये विकास शुल्क भरून घेण्याबाबत. | . . |
| (५) | पाच | अवैध गौण खनिज उत्खनाबाबत | . . |
| (६) | सहा | महात्मा गांधी तंटामुक्त अभियानाच्या समितीच्या बैठका घेण्याबाबत. | . . |
| (७) | सात | अपूर्ण बंधारे पूर्ण करण्याबाबत | . . |
| | | **परिशिष्ट**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, जालना (प्रशासन)

**जालना जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात**

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत जालना जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे व अनौपचारिक चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात अध्यक्ष, जिल्हा परिषद, जालना यांनी समितीस जिल्हा परिषदेमध्ये कर्मचा-यांचा अनुशेष मोठा आहे अशी माहिती समितीला दिली असता उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, यांनीही त्यासंदर्भात समितीस विशद केले की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग अशा अनेक विभागांमध्ये अधिकारी / कर्मचा-यांचा मोठा अनुशेष आहे. जिल्हयामध्ये कार्यकारी अभियंता यांचा पदभार कनिष्ठ अभियंता यांच्याकडे देण्याइतपत परिस्थिती निर्माण झाली होती. अर्थात, तसे केले नाही. यावर सदरहू ही बाब गंभीर असल्याचे नमुद करून कार्यकारी अभियंता यांचा पदभार कनिष्ठ अभियंता यांच्याकडे देण्याची परिस्थिती निर्माण होण्याला नेमकी काय कारणे आहेत, दरम्यानच्या काळात किती लोकांना कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती देण्यात आली व त्यापैकी किती कार्यकारी अभियंता जिल्हा परिषदेमध्ये नियुक्त करण्यात आले यासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान विचारणा करण्यात येईल असे स्पष्ट केले.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

जालना जिल्हा परिषदेमध्ये आरोग्य विभाग, शिक्षण विभाग अशा अनेक विभागांमध्ये अधिकारी / कर्मचा-यांचा मोठा अनुशेष आहे. कार्यकारी अभियंता यांचा पदभार कनिष्ठ अभियंता यांच्याकडे देण्याइतपत परिस्थिती निर्माण झाल्याप्रकरणी सदर अनुशेष व रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

जालना जिल्हा परिषदेमधील आरोग्य विभागाअंतर्गत गट अ ची १५ पदे (ADHO-1, DRCH-1, THO-1 व MO-12) रिक्त आहेत. तसेच शिक्षण विभागाअंतर्गत गट-अ ची २ पदे [शिक्षणाधिकारी (प्रा) -१, शिक्षणाधिकारी (माध्य)-१] रिक्त असून गट-ब ची १० पदे (उपशिक्षणाधिकारी-१, गट शिक्षणाधिकारी-५ व अधीक्षक शालेय पोषण आहार-४) रिक्त आहेत. बांधकाम विभागाअंतर्गत गट-अ ५ पदे (उप कार्यकारी अभियंता-१ व उप अभियंता-४) रिक्त आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागातील गट विकास अधिकारी या संवर्गात १ पद व सहाय्यक गट विकास अधिकारी या संवर्गात २ पदे रिक्त आहेत.

वरील आरोग्य विभाग, सामान्य प्रशासन विभाग, शिक्षण विभाग व बांधकाम विभाग या व इतर विभागातील वर्ग १ व वर्ग-२ या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरून त्या त्या सबंधीत मंत्रालयीन विभागाकडून करण्यात येते. जिल्हा परिषदेकडील वरील संवर्गातील रिक्त पदांचा मासिक अहवाल शासनास सादर करण्यात येतो.

श्री. रामदास तु. खलसे, कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे दिनांक १ एप्रिल २०१९ रोजी रूजू झालेले असून सबंधीत हे दिनांक २ एप्रिल २०१९ पासून ते आज पर्यंत वैद्यकीय कारणास्तव रजेवर आहेत. वर्ग-३ कर्मचा-यांची सरळसेवेने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरून सुरू आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**(१) आरोग्य सेवा संचालनालयाचे अभिप्रायः—**(१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक २ मार्च २०१५ अन्वये गट-अ, वैद्यकीय अधिकारी नियमितपणे उपलब्ध होईपर्यंत एमबीबीएस तसेच पदव्युत्तर अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यांसाठी नेमणूक करण्यासाठी मान्यता घेण्यात आली तसेच शासन निर्णय दिनांक ३ डिसेंबर, २०१८ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार पद भरतीची कार्यवाही जिल्हास्तरावरून होणे अपेक्षित आहे. (२) ७३८ अस्थायी वैद्यकीय अधिकारी, गट-ब (बीएएमएस) यांच्या समावेशनाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिनांक १९ ऑगस्ट २०१८ रोजी मंजूर झाला असून त्यानुसार वैद्यकिय अधिकारी, गट-ब ची समावेशनाची प्रक्रिया पूर्ण झालेली असून जिल्हा परिषद, जालना येथे ३ वैद्यकीय अधिकारी, गट-ब यांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. (३) तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची कायमस्वरूपी ८७७ पदांची जाहिरात देण्यात आलेली होती. त्यानुसार प्राप्त अर्जाची छाननी करून पात्र २९९१ उमेदवारांमधून समुपदेशनाद्वारे नियुक्ती देण्याची प्रक्रिया आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई येथे दिनांक २३ जुलै २०१९ ते दिनांक ३० जुलै २०१९ या कालावधीत झालेली असून यामधून रिक्त पदे नियमितरित्या भरण्याची कार्यवाही झालेली असून आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद, जालना येथे १९ वैद्यकीय अधिका-यांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.

**(२) शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :—** रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

**(३) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय :—** जालना जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गात एक पद मंजूर आहे. शासन आदेश दिनांक ७ मार्च, २०१९ अन्वये सदर पदावर श्री. रामदास तु. खलसे यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली असून ते दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी सदर पदावर रूजू झाले आहेत.

**४) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (आस्था-८):—** जिल्हा परिषद गट क ची भरती प्रक्रिया चालू आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, समितीने जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसमवेत बैठक घेतली असता जालना जिल्हा परिषदमध्ये आरोग्य विभाग, शिक्षण विभाग अशा अनेक विभागांमध्ये अधिका-यांचा मोठा अनुशेष असल्याचे समितीला आढळून आले. त्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक २३ जुलै ते ३० जुलै दरम्यान समुपदेशनाने पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली. तसेच ७३० वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्यात आली. त्यापैकी १९ वैद्यकीय अधिकारी जालना जिल्हा परिषदेमध्ये पाठविण्यात आले होते. त्यापैकी १६ डॉक्टर कामावर रूजू झाले असून एक पद बदलीने भरलेले आहे. तसेच ३ बी.ए.एम.एस. डॉक्टरांना समावेशनाने पदोन्नती देण्यात आली आहे. ८३ डॉक्टर पदांपैकी ६४ डॉक्टरांची पदे भरलेली आहेत. तसेच २० तारखेला पुन्हा कौन्सिलिंग ठेवलेली आहे.

समितीने विचारणा केली की, समितीने दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी जालना जिल्ह्याचा दौरा केला होता. त्यानंतर दिनांक ३ डिसेंबर, २०१८ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. समितीने केलेल्या पाहणीनंतर जे प्रश्न उपस्थित करण्यात आले त्या अनुषंगाने सदरहू उत्तर देण्यात आलेले नाही. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, समितीला आजची परिस्थिती सांगितली. दरम्यानच्या काळात शासन स्तरावरून जिल्हाधिका-यांना वॉक इन इंटरव्ह्यू घेण्याचे आदेश देण्यात आले होते. पुढे समितीने विचारणा केली की, समितीने केलेल्या दौ-याच्या वेळी जी रिक्त पदे होती ती भरण्यास शासनाची बंदी होती का. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, या संदर्भात पदे भरण्यासंबंधी जाहिरात काढण्यात आली होती. परंतु मा.न्यायालयात आरक्षणाची याचिका सुरू असल्यामुळे ती पदे भरू शकलो नाही. पुढे समितीने अशी विचारणा केली की, या संदर्भात लेखी स्पष्टीकरणामध्ये कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. समितीने दौरा केल्यानंतर त्या संदर्भात ज्या बाबी आढळून आल्या होत्या त्याबाबतची समितीने माहिती मागितली आहे. परंतु आपण समितीला आजची परिस्थिती सांगत आहात. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, सध्याच्या परिस्थितीत जालना जिल्हा परिषदेमध्ये १९ डॉक्टर रूजू झालेले आहेत. शासनाने सन २०१५ मध्ये असा निर्णय घेतला होता की, सर्कलच्या डीडी यांनी अस्थायी डॉक्टरांची नियुक्ती करावी. यावर समितीने विचारणा केली की, या संदर्भात लेखी स्पष्टीकरणात कोणताही उल्लेख नाही. या संदर्भात सन २०१५ मध्ये शासनाने निर्णय घेतलेला असताना सन २०१८ पर्यंत डॉक्टरांची पदे रिक्त का ठेवण्यात आली. तसेच समितीने जालना जिल्हा परिषदेला ज्या कालावधीत भेट दिली होती तेव्हा आरोग्य विभागामध्ये अनेक डॉक्टरांची पदे रिक्त असल्याचे आढळून आले होते. त्यापूर्वी आपल्याला ती पदे भरण्याची परवानगी असताना सुध्दा डॉक्टरांची अनेक पदे रिक्त होती परिणामी तेथील जनतेला आरोग्याच्या सेवेपासून वंचित ठेवण्याचे काम झाले. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, सन २०१५ पासून जालना जिल्हा परिषदेमध्ये किती डॉक्टर पाठविण्यात आले व त्यापैकी किती डॉक्टर रूजू झाले याची माहिती नंतर समितीला देण्यात येईल असे समितीला आश्वासित केले. डॉक्टरांची संख्या सातत्याने बदलत असते. ८३ पैकी ६४ एम.बी.बी.एस. डॉक्टरांची पदे भरली असून १९ पदे रिक्त आहेत. त्यापैकी ३ उमेदवारांना नियुक्तीचे आदेश दिलेले आहेत. या संदर्भात अशी पद्धत आहे की, डॉक्टरांना कौन्सिलिंगकरिता बोलवत असताना त्यांची ज्येष्ठता यादी तयार केली जाते. त्यावेळी त्या डॉक्टरांना राज्यातील रिक्त पदांची स्क्रीनवर माहिती दिली जाते. त्यानुसार सदरहू डॉक्टर आपल्या पसंतीनुसार संबंधित जिल्ह्यांची निवड करीत असतात. त्या अनुषंगाने १९ डॉक्टरांनी जालना जिल्ह्याची निवड केल्यामुळे त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले. यावर समितीने विचारणा केली की, डॉक्टरांची पदे भरण्यासंबंधी शासनाकडून वर्षाचा कालबद्ध कार्यक्रम ठरवला जात असतो. परंतु डॉक्टरांची पदे भरण्यास विलंब होत असल्यामुळे कामाचे मूल्यांकन कसे ठरवले जाते. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, विलंबाचा प्रश्न निर्माण होत नाही. ३ पद्धतीने डॉक्टर पदांची भरती केली जाते. त्यात समुपदेशनाने जाहिरातीद्वारे भरती केली जाते. त्यानुसार माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये जाहिरात काढण्यात आली होती. दरम्यानच्या काळात आरक्षणासंबंधी कोर्ट केसेस सुरू असल्यामुळे त्यावेळी पदे भरण्याची कार्यवाही करता आली नाही. माहे जुलै महिन्यात उच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर विभागाला सामान्य प्रशासन विभागाकडून रिक्त पदे भरण्याची परवानगी मिळाली. त्यानंतर आपल्याकडे डॉक्टर पदावर कार्यरत होण्यासाठी ३ हजार अर्ज प्राप्त झालेले होते. त्या सर्वांना कौन्सिलिंगच्या वेळी बोलाविण्यात

आले होते. त्यावेळी जेवढे डॉक्टर आले त्या सर्वांना राज्यातील रिक्त पदांची माहिती देण्यात आली. त्यानुसार सदर डॉक्टरांनी त्यांच्या पसंतीनुसार जिल्हयांची निवड केली. आपण डॉक्टरांना त्यांच्या ज्येष्ठता यादीनुसार नियुक्तीचे जिल्हे निवडण्याची मुभा देत असतो. त्या दिवशी ६२७ डॉक्टराना नियुक्तीचे आदेश देण्यात आले होते. त्यापैकी १९ डॉक्टरांनी जालना जिल्हयाची निवड केली होती. त्यापैकी १६ डॉक्टर तेथे रूजू झालेले आहेत. ही कार्यवाही राज्य शासनाच्या स्तरावरून होत असते. दुसरी पध्दत अशी आहे की, प्रत्येक जिल्हाधिका-यांना आपापल्या जिल्ह्यांमध्ये स्थायी डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याचे अधिकार आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वॉक-इन इंटरव्ह्यू घेत असतात. त्यात जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य म्हणून कार्यरत असतात. तिसरी पध्दत अशी आहे की, सन २०१५ च्या शासन निर्णयानुसार अस्थायी वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्याकरिता समिती गठित केलेली आहे. अस्थायी डॉक्टरांची पदे ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरली जातात. सन २०१५ च्या शासन निर्णयानुसार अस्थायी डॉक्टरांना ४५ हजार रूपये वेतन देण्याचे शासन स्तरावरून निश्‍चित करण्यात आले होते. परंतु इतक्या कमी वेतनामध्ये अस्थायी डॉक्टर मिळू शकत नव्हते. आता वित्त विभागाने एक महिन्यापूर्वी त्यात आणखी १५ हजार रुपये वाढविण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार आता अस्थायी डॉक्टरांची पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. पुढे समितीने विचारणा केली की, जिल्हाधिका-यांना रिक्त पदे भरण्याचे अधिकार आहेत. परंतु त्यांनी त्यासंबंधी कार्यवाही केलेली नाही. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, आता जालना जिल्ह्यात विधान परिषद उमेदवाराची निवडणूक असल्यामुळे आचारसंहिता सुरू आहे.

समितीने निदेश दिले की, जालना जिल्ह्यातील डॉक्टरांची रिक्त पदे तातडीने भरून जनतेला आरोग्य सुविधा मिळण्यासंबंधी काळजी घ्यावी. तसेच शालेय शिक्षण विभागाने रिक्त पदे भरण्यासंबंधी कार्यवाही सुरू असल्याचे अभिप्राय दिलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने जालना जिल्ह्यामध्ये मंजूर असलेल्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर श्री. रामदास खलसे यांची पदोन्नतीने नियुक्ती केली असून ते दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी कामावर रूजू झाल्याचे अभिप्राय दिलेले आहेत. तसेच ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद गट- क ची भरती प्रक्रिया सुरू असल्याचे अभिप्राय दिलेले आहेत. ग्रामविकास विभागाने लेखी स्पष्टीकरणामध्ये प्रत्येक ठिकाणी भरती प्रकिया सुरू असल्याचे नमूद केले आहे. परंतु तेथे विभागाने नेमकी आकडेवारी देणे आवश्यक आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, गट-क व गट-ड संवर्गातील पदे जिल्हा परिषदेच्या स्तरावरून भरली जातात. परंतु गट-क ची पदे भरण्याबाबत वित्त विभागाकडून असे आदेश काढले होते की, नवीन आकृतीबंध मंजूर होईपर्यंत भरती करू नये. आता वित्त विभागाने गट-क ची पदे भरण्याबाबत बंदी उठविली असल्यामुळे १३ हजार पदांच्या महाभरतीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने १२-१३ लाख उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत. पुढे समितीने विचारणा केली की, या संदर्भात लेखी स्पष्टीकरणात उल्लेख करण्यात आलेला नाही. आतापर्यंत गट-क ची पदे भरण्यासाठी जिल्हा परिषदेच्या स्तरावर परीक्षा घेण्यात आल्या व त्यानंतर उमेदवारांना नियुक्त्या दिल्या जात होत्या. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, पूर्वीच्या काळात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समितीच्या माध्यमातून जिल्हा स्तरवर ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेतल्या जात होत्या. आता शासनाने ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर ऑनलाईन परीक्षा घेतल्या जात आहेत. या संदर्भात आयटी विभागाने निविदा काढून संबंधित यंत्रणेला राज्यस्तरीय मंजूरी दिलेली आहे. तसेच जिल्हा परिषद सक्षम प्राधिकारी असल्यामुळे उमेदवारांची नियुक्ती जिल्हा परिषदेकडून केली जाते. परंतु त्यापूर्वी भरती करण्यासाठी आयटी विभागाने संबंधित यंत्रणेला राज्यस्तरीय मंजुरी दिली असून त्यांच्याद्वारे उमेदवारांची ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाते. तसेच गट-क ची पदे भरण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला आहेत. त्या संदर्भात शासन स्तरावरून फक्त ऑनलाईन परीक्षा घेऊन त्यांचे निकाल जिल्हा परिषदांना कळविले जातात. त्यानंतर त्यांनी संबंधित नियुक्त्या देण्यासंबंधी कार्यवाही करायची असते.

## अभिप्राय व शिफारशी

जालना जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागामध्ये गट "अ" ची १५ पदे रिक्त आहेत, शिक्षण विभागामध्ये गट "अ" ची २ पदे व गट "ब" ची १० पदे रिक्त आहेत, बांधकाम विभागांतर्गत गट "अ" ची ५ पदे रिक्त आहेत. सामान्य प्रशासन विभागामध्ये गट विकास अधिकारी या संवर्गात १ पद, सहायक गट विकास अधिकारी या संवर्गात २ पदे रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असून जिल्हापरिषदेमधील फार मोठ्या प्रमाणातील रिक्त पदांच्या अनुशेषामुळे कार्यकारी अभियंत्याचा कार्यभार कनिष्ठ अभियंत्याकडे सोपविण्याची पाळी जिल्हा परिषदेवर आली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान दिनांक २३ ते ३० जुलै, २०१९ दरम्यान १९ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती केली असून त्यापैकी १६ वैद्यकीय अधिकारी कामावर रूजू झाले आहेत. ३ बी.ए.एम.एस. डॉक्टरांची पदोन्नतीने नियुक्ती झाली असून ८३ डॉक्टर पदांपैकी ६४ डॉक्टरांची पदे भरण्यात आली असल्याचे समितीस अवगत करण्यात आले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०२ मार्च,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैद्यकीय अधिकारी नियमीतपणे उपलब्ध होईपर्यंत एम.बी.बी.एस. तसेच पदव्युत्तर अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यांकरीता नेमणूक करण्याची मान्यता देण्यात आली असून

सर्कलच्या डीडी यांनी अस्थायी डॉक्टरांची नियुक्ती करावी अशी तरतूद असूनही सन २०१८ पर्यंत डॉक्टरांची पदे भरण्यामध्ये जिल्हा परिषदेसह आरोग्य सेवा संचालनालय व मंत्रालयीन आरोग्य विभाग यांचेकडून सत्वर कार्यवाही न झाल्याने जिल्हयातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेला आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागले. हीच परिस्थिती सर्व राज्यभर असून वेळीच रिक्त पदे भरण्यासंदर्भात सर्व सबंधित यंत्रणांकडून तत्पर कार्यवाही होत नसल्याचेही समितीला आढळून आले आहे.

**यानुषंगाने सन २०१५ ते सन २०१८ या कालावधीत वैद्यकीय अधिका-यांचा फार मोठया प्रमाणातील रिक्त पदांचा अनुशेष असतांनाही पद भरती संदर्भात जिल्हा परिषद, आरोग्य सेवा संचालनालय व मंत्रालयीन आरोग्य विभाग यामध्ये कोणत्या स्तरावर पद भरती संदर्भात विलंब झाला याची सविस्तर चौकशी करण्यात यावी व सबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, तसेच वैद्यकीय अधिका-यांची उर्वरित रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात कार्यवाही व्हावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत समितीला उपलब्ध करून देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाधिकारी (माध्य.) याचे एक व गट शिक्षणाधिकारी यांची ५ तसेच अधीक्षक, शालेय पोषण आहार यांची ४ पदे रिक्त आहेत. गट "क" व गट "ड" संवर्गातील पदे जिल्हा परिषदेच्या स्तरावरून भरण्यात येत असून राज्य शासनाच्यामार्फत राबविण्यात येणा-या १३ हजार पदांच्या मेगाभरती अनुषंगाने आयटी विभागामार्फत निविदा काढून सबंधित यंत्रणेला राज्यस्तरीय मंजूरी दिली असून ऑनलाईन पध्दतीने नियुक्त्या केल्या जाणार असल्याचे समितीस साक्षीदरम्यान अवगत करण्यात आले. **यानुषंगाने जिल्हा परिषद स्तरावरून गट "क" व गट "ड" ची रिक्त पदे भरण्यासंदर्भात तातडीने पाठपुरावा करण्यात यावा तसेच शासन स्तरावरून शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, अधीक्षक, शालेय पोषण आहार यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागामध्ये उप कार्यकारी अभियंता याचे एक पद व उप अभियंता यांची ५ पदे रिक्त असल्याचे तसेच कार्यकारी अभियंता या पदावर नियुक्ती केलेले श्री. खलसे यांनी सेवेवर रूजू होऊन लगेच दुस-या दिवसापासून वैद्यकीय रजा घेतल्याने शासनाने केलेल्या नियुक्तीचा कोणताही उपयोग जिल्हा परिषदेस झाला नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **यानुषंगाने नमुद सर्व रिक्त पदे भरण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात यावी, कार्यकारी अभियंता यासारख्या महत्वाच्या पदावर नियुक्ती देतांना सबंधित व्यक्तीची सेवा त्याठिकाणी मिळेल याची चाचपणी करूनच नियुक्ती द्यावी.**

**तसेच जिल्हा परिषद अंतर्गत सामान्य प्रशासन विभागातील गट विकास अधिकारी तसेच सहाय्यक गट विकास अधिकारी यांची पदे देखील त्वरित भरण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस उपलब्ध करून द्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दोन

### जिल्हा परिषद, जालना (प्रशासन)

### लेखा परीक्षण नियमावलीनुसार सन २०१३-१४ चा वार्षिक लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवाल सर्वसाधारण सभेसमोर न ठेवल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत जालना जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषद, जालना या ठिकाणी अशा प्रकारची वेगळी प्रथा पहिल्यांदाच पहावयास मिळत आहे. सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालावर साक्ष सुरू असताना, त्या अहवालास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली नाही. या शिवाय ब-याच सन्माननीय समिती सदस्यांना माहिती पुस्तिकेची प्रत सुध्दा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. समितीला सुद्धा माहिती पुस्तिका प्राप्त झालेली नाही. तसेच या अहवालाच्या अनुषंगाने शुद्धिपत्रक देण्यापूर्वी अगोदर त्या बाबत रितसर कळविणे आवश्यक होते. परंतु ती सुद्धा तसदी जिल्हा परिषदेने घेतली नाही. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात तपासणी करून व तीन वेळा नोटीस देऊनही ज्या सूचना केलेल्या होत्या त्यांचे पालन करण्यात आलेले नाही. एकंदरीत जिल्हा परिषदेच्या या सर्व कारभारामुळे समितीचा वेळ वाया जात आहे. समितीची दिशाभूल करण्याचे काम, जिल्हा परिषदेच्या सदस्यांना डावलण्याचे काम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून होत आहे. एकप्रकारे त्यांच्याकडून समितीचा अवमान करण्यात येत आहे. या प्रकरणी जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन, तातडीने कारवाई केली पाहिजे. तसेच या प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष लावण्यात यावी.

समितीच्या सचिवांनी सुरुवातीलाच बैठकीच्या वेळी साक्षीदारांनी अनुसरावयाची वागणूक व शिष्टाचार विषयक नियमांचे वाचन केले होते. परंतु जिल्हा परिषदेने त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे. ज्यांनी समितीचा अवमान केलेला आहे त्या सर्व संबंधितांवर समितीकडून विशेषाधिकार भंगाची नोटीस तात्काळ दाखल करण्यात येईल, अशी नाराजी व्यक्त करून समितीने संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेने सन २०१३-१४ या वर्षाचा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल समितीसमोर कोणाच्या स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक होते. यावर संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांनी समितीस विशद केले की, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक आहे. यावर समितीने मत व्यक्त करीत संबंधिताना विशद केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची अहवालास मंजुरी घेतलेली नाही. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सदरहू अहवालाच्या अनुषंगाने देण्यात आलेली उत्तरे ही असत्य आहेत, असे समितीचे मत आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेला डावलून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहवाल सादर केल्यामुळे समितीचा मुख्य कार्यकारी अधिका-यांवर विश्वास नाही. यावर संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांनी समितीस विशद केले की, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने सदरहू अनुपालन अहवालास मंजुरी देणे आवश्यक होते.

पुढे समितीने अशी विचारणा केली की, वास्तविक पाहता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सर्वसाधारण सभेसमोर अनुपालन अहवाल ठेवून त्यास मंजुरी घ्यावयास हवी होती. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या सूचनेनुसार त्यांना समितीसमोर सदरहू अनुपालन अहवाल सादर करता आला असता. समितीचे स्पष्ट मत आहे की, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जिल्हा परिषदेला डावलून हा अहवाल सादर केलेला आहे. ज्यावेळी एखादी जिल्हा परिषद बरखास्त केली जाते त्यावेळी राज्य शासनाच्या माध्यमातून त्या ठिकाणी आयुक्त यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली जाते. त्यावेळी प्रशासकांच्या मान्यतेने समितीसमोर अहवाल सादर केला जातो. परंतु या जिल्हा परिषदेमध्ये असे काहीही घडलेले नसल्यामुळे सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने समितीसमोर अहवाल ठेवणे अपेक्षित होते. या संपूर्ण विषयाच्या बाबतीत विभागीय उपायुक्त यांचे काय म्हणणे आहे. यावर उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त यांनी समितीस विशद केले की, लेखापरीक्षा नियमावलीनुसार लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याचे प्रथम अनुपालन होते. सदरहू अहवाल विषय समिती आणि सर्वसाधारण सभेसमोर जाणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे काही आक्षेप तपासणीत आढळून आले होते. या प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्याकडून खुलासा मागवून कारवाई करण्यात येईल.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, या प्रकरणी विभागीय आयुक्तांनी तातडीने चौकशी करून त्या बाबतचा अहवाल सादर करणे आवश्यक असून बैठकीच्या अनुषंगाने समितीपुढे एक अतिशय गंभीर मुद्दा उपस्थित झाला आहे. समितीपुढे लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सादर करण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी घेणे आवश्यक होते. विभागीय आयुक्तांनी या संदर्भात सूचना करुनही सदरहू अहवाल विषय समिती किंवा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला नाही. या प्रकरणी सखोल चौकशी करून त्या बाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत शासन स्तरावर सादर करावयास पाहिजे. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सदरहू चौकशी अहवाल विचारात घेण्यात येईल.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

लेखा परीक्षा नियमावली नुसार सन २०१३-१४ या वर्षाचा लेखा परीक्षा पुर्नविलोकन अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रथम अनुपालन होणे आवश्यक होते. तसेच सदरहू अहवाल जिल्हा परिषदेच्या विषय समिती आणि सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे आवश्यक होते. तथापि, लेखा परीक्षा नियमावली नुसार कार्यवाही न केल्याप्रकरणी चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. अद्याप कोणती कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

उपरोक्त मुदयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

जिल्हा परिषद जालनाच्या सन २०१३-१४ स्थानिक निधी लेखा परीक्षण अहवाल जिल्हा परिषदेतील विविध विभागांना प्राप्त झालेले आहेत. महिला व बालकल्याण विभाग वगळता इतर सर्व विभागांनी मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियम, १९३० चे कलम १०(१) नुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**(१) वित्त विभागाचे अभिप्रायः-** अप्राप्त

**(२) ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**(३) विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे अभिप्रायः—**विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी चौकशी केलेली आहे. चौकशीत (१) महिला व बालकल्याण विभागाने सर्वसाधारण सभेसमोर अहवाल सादर केलेला नाही. (२) लघुपाटबंधारे विभागाने ४ महिन्याच्या विलंबाने तसेच बांधकाम विभागाने १ महिन्याच्या विलंबाने अहवाल सादर केलेला आहे. (३) याअनुषंगाने वरील तिन्ही विभागातील जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांना शिस्तभंगाविषयक कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षा नियमावलीनुसार सन २०१३-१४ या वर्षाचा लेखा परीक्षा पुर्नविलोकन अहवाल प्राप्त झाल्यानंतर अनुपालन होणे आवश्यक होते. तसेच सदरहू अहवाल विषय समिती व सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे आवश्यक होते. परंतु त्या संदर्भात कार्यवाही न केल्यामुळे त्याची चौकशी करून कार्यवाही करण्याचे समितीने निदेश दिले होते. त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, फक्त महिला बालकल्याण विभागाचा अनुपालन अहवाल सर्व साधारण सभेसमोर गेला नव्हता. या संदर्भात विभागीय आयुक्तांनी चौकशी करून त्यात जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे प्रस्तावित केले होते. इतर सर्व विभागांचे अनुपालन अहवाल विषय समिती व सर्वसाधारण सभेसमोर ठेवलेले आहेत. पुढे समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षण सन २०१३-१४ मध्ये झाले. त्यानंतर लेखा आक्षेपासंबंधी अनुपालन अहवाल तयार केल्यानंतर कोणत्या वर्षी जिल्हा परिषदेची मान्यता घेण्यात आली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, सन २०१५ मध्ये सर्व विभागांनी त्यांच्याकडील लेखा परीक्षणाच्या आक्षेपासंबंधी अनुपालन अहवाल तयार करून सर्वसाधारण सभेमध्ये ठेवले आहेत. पुढे समितीने विचारणा केली की, आपण शासनाकडे अनुपालन अहवाल पाठविला त्यावेळी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची त्याकरता मान्यता घेण्यात आली नव्हती. हा विषय समितीने त्यावेळी उपस्थित केला त्यावेळीही समितीला कोणत्याही प्रकारचे उत्तर देण्यात आले नव्हते. अन्यथा आज हा प्रश्न येथे उपस्थित झाला नसता. त्यावेळी सर्वसाधारण सभेने अनुपालन अहवालाला मान्यता दिल्यासंबंधी कागदोपत्री माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे का. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, माझ्याकडे सदर माहिती कागदोपत्री उपलब्ध आहे. यावर समितीने विचारणा केली की, आपल्याकडे कागदोपत्री माहिती उपलब्ध असल्यामुळे त्याचवेळी समितीला सदर माहिती का देण्यात आली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीला विशद केले की, त्याच दिवशी समितीने अनुपालन अहवाल पाठवावा व त्यासंदर्भात कार्यवाही करण्यास सांगितले होते. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेमध्ये झालेल्या साक्षीच्या वेळी आपण समितीला यासंदर्भात माहिती दिली असती तर हा प्रश्न तेथेच निकाली निघाला असता. परंतु तेव्हा याबाबतीत समितीला कोणतीही माहिती देण्यात आली नाही. जिल्हा परिषदेचे कार्यालयीन प्रमुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी असल्यामुळे त्यांनी सर्व विभागांचे लेखा आक्षेप विषय समितीकडून आल्यानंतर खात्री करून जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे अत्यावश्यक असते. परंतु अशा प्रकारची कार्यवाही न करता शासनाकडे परस्पर अनुपालन अहवाल पाठविण्यात आला होता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, महिला बालकल्याण विभाग वगळता उर्वरित सर्व विभागांचे अनुपालन अहवाल सर्वसाधारण समितीसमोर ठेवण्यात आले होते. यासंदर्भात महिला व बालकल्याण विभागातील संबंधित वरिष्ठ सहाय्यकाची चौकशी करून त्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. तसेच दोन विभागाच्या अधिका-यांकडून विलंबाने अनुपालन अहवाल ठेवण्यात आले होते. पुढे समितीने विचारणा केले की, यासंदर्भात वरिष्ठ सहाय्यकाची काय भूमिका आहे. लेखा परीक्षण अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी

यांच्या नावाने उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर केले जातात. त्यामुळे सदर प्रकरणी वरिष्ठ सहाय्यकावर कारवाई का केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, लेखा परीक्षण अहवालास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्यास जबाबदार असलेल्या वरिष्ठ सहय्यकावर कारवाई करण्यात आली आहे. कारण लेखा परीक्षण अहवाल सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यासाठी घ्यावयाच्या मान्यतेची नस्ती विभाग प्रमुखांकडे वेळेवर सादर करण्याची जबाबदारी ही वरिष्ठ सहाय्यकांची होती. तसेच संबंधित वरिष्ठ सहायकाकडे लेखा परीक्षण अहवालासंदर्भातील काम सोपविण्यात आले होते. समितीला हे मान्य आहे. परंतु ज्यावेळी लेखा आक्षेप निघाला त्यावेळी सर्व तपासणी करून खातरजमा करण्याची संबंधित विभाग प्रमुखांची जबाबदारी होती. तसेच लेखा परीक्षकांनी ज्या दिवशी आक्षेप घेतला त्या दिवशी वरिष्ठ सहायक कार्यरत असतील तर त्या दिवशीच्या दैनंदिन टिपण्या तपासून त्यांनी चांगले काम केल्याबद्दल त्यांचा पगार काढला. मग केवळ त्यांच्यावर कारवाई करण्यामागील हेतू काय आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, यामध्ये अंतिम सर्व जबाबदारी सचिव यांची व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहणार आहे. परंतु लेखा परीक्षणाचे काम संबंधित वरिष्ठ सहायकाकडे वितरित करण्यात आले होते. त्यांची जबाबदारी होती की, त्यांनी ही बाब वरिष्ठांकडे सादर करावी. वरिष्ठ सहायकांनी सदरहू बाब विभाग प्रमुखांकडे सादर करून सुद्धा जर त्यांनी त्यावर निर्णय घेतला नाही तर अशा वेळी विभाग प्रमुखांची जबाबदारी असते. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे अनुपालन अहवाल ठेवण्याची जबाबदारी विभाग प्रमुखामार्फत मुख्य कार्यकारी अधिका-यांची होती. मग यामध्ये वरिष्ठ सहायकांची जबाबदारी कशी येते. मुळात ही बाब सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची जबाबदारी ही विभाग प्रमखांचीच होती. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, विभाग प्रमुखांनी हे काम वरिष्ठ सहायकांकडे सोपविले होते.

समितीने विचारणा केली की, अनुपालन अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची जबाबदारी वरिष्ठ सहायकांची नव्हती. वास्तविक पाहता विषय सूचीवर विषय आणण्यासाठी नस्ती सादर करावयास पाहिजे होती. मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या माध्यमातून उप मुख्य कार्यकारी अधिका-यांमार्फत सदरहू नस्ती जिल्हा परिषद अध्यक्षांकडे जावयास पाहिजे होती. तरच तो विषय हा विषय सूचीवर आला असता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, ही नस्ती सादर करताना संबंधित वरिष्ठ सहायकांनी दुर्लक्ष केले, यात विलंब झाला. कारण संबंधित विभाग प्रमुखांपर्यंत यासंदर्भातील माहितीच पोहचली नाही.

याबाबत समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे विषय सूचीचे विषय कोणाकडून सादर करण्यात येतात. हे विषय वरिष्ठ सहायक करतात की विभाग प्रमुख सादर करतात. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, वरिष्ठ सहायक हे विभाग प्रमुखांकडे सादर करतात. यावर समितीने विचारणा केली की, सर्व विभागाचे लेखा परीक्षण अहवाल आल्यानंतर सर्व विभाग प्रमुख जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे ते मान्यतेसाठी सादर करतात. परंतु महिला व बालकल्याण विभागाच्या विभाग प्रमुखांनी अहवाल सादर केला नाही. सदरहू अहवाल सादर करण्याची जबाबदारी वरिष्ठ सहायकाची होती तर विभाग प्रमुखाची नव्हती, असे म्हणायचे आहे काय. याबाबी उप मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे सादर करण्यात येतात. सदरहू अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची त्यांची जबाबदारी होती. परंतु त्यांना नोटीस दिली नाही, त्यांच्यावर कारवाई केली नाही. मुळात या प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, संबंधित विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. विभाग प्रमुखांना सक्त ताकीद देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला नाहीत. श्रीमती अर्चना अंभोरे, वरिष्ठ सहायक यांच्या संदर्भात माननीय आयुक्तांच्या अहवालात नमूद केले आहे की, त्यांनी ऑडीट पॅरा सादर केला नाही, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई निश्चित करावी. त्यानुसार जिल्हा परिषदेने त्यांच्यावर कारवाई निश्चित केली आहे.

समितीने स्थानिक निधी संचालक यांना विचारणा केली की, लेखा आक्षेपा संदर्भातील अहवाल कोणाच्या नावे दिला जातो. यावर स्थानिक निधी संचालक नवी मुंबई यांनी समितीस विशद केले की, लेखा परीक्षण अहवालासंदर्भात प्रत्येक विभाग प्रमुखांबरोबर चर्चा केली जाते. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिक-यांना अंतिम अहवाल सादर केला जातो. प्रत्येक विभाग प्रमुखांची जबाबदारी आहे की, लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन त्याचे प्रथम अनुपालन स्थानिक निधी लेखा विभागाला द्यावे. विभाग प्रमुख आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची ती जबाबदारी आहे. यावर समितीने विचारणा केली की, आजच्या साक्षीसाठी बोलाविलेल्या सर्व विभागाचे सचिव उपस्थित आहेत. कारण त्यांच्या विभागाचे विभाग प्रमुख जिल्हा परिषदेमध्ये आस्थापनेवर आहेत. परंतु त्या विभाग प्रमुखांना आपली विषय सूची काय आहे, आपला अजेंडा काय आहे, आपले कोणते विषय सर्वसाधारण सभेपुढे जातील, कोणते विषय हे विषय समितीपुढे येतील, कोणते विषय स्थायी समितीपुढे जातील, याचे प्रशिक्षण नाही. या संदर्भात सर्व काही ठरविण्याचा अधिकार उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे. माहिती पुस्तिकेत कारवाई प्रस्तावित करण्यात येईल असे नमूद केले आहे. मुख्य कार्यकारी अधिका-याना कारवाई करण्याचे अधिकार नसतील तर विभागीय आयुक्त किंवा विभागीय सचिव यांना ते अधिकार आहेत. समितीला वाटते आपण संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. चौकशी अहवालात असे नमूद आहे की, श्रीमती वर्षा एस. पवार, तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, जालना यांच्याविरूद्ध शिस्तभंग विषयक कारवाई महिला व बालविकास विभागाकडे प्रस्तावित

करावी. विभागीय आयुक्तांच्या चौकशी अहवालानुसार जिल्हा परिषदेने विभागाकडे कारवाई प्रस्तावित केली आहे काय. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. परंतु त्यांनी जो खुलासा सादर केला त्यावरून असे निदर्शनास आले की, यामध्ये विभाग प्रमुखांची चूक नव्हती. यावर याचा अर्थ विभागीय आयुक्तांनी केलेल्या चौकशीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा विश्वास नाही का, असे समितीने मत व्यक्त केले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, तसे नाही. जिल्हा परिषदेकडून कारवाई करण्यासंदर्भातील प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर पाठविलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, विभागीय सचिव हे मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या उत्तरावर समाधानी आहेत काय. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, जो चौकशी अहवाल आला होता त्या अनुषंगाने कारवाई करून संबंधित विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस दिली होती. परंतु नोटीसला दिलेल्या उत्तरावरून असे दिसून आले की, विभाग प्रमुखांपर्यंत हा विषयच आला नव्हता.

समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी वारंवार हेच सांगत आहेत की, विभाग प्रमुखांपर्यंत सदरहू नस्ती पोहचलीच नव्हती. मुळात सदरहू नस्ती मागवून घेण्याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमखांची होती. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करावयास पाहिजे. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेला विभाग प्रमुख महत्त्व देत नाहीत आणि पंचायती राज समितीला मुख्य कार्यकारी अधिकारी महत्त्व देत नाहीत. वरिष्ठ सहायकांवर कारवाई करण्याऐवजी विभाग प्रमुखांवर कारवाई करावयास पाहिजे. विभागीय आयुक्तांच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी संबंधित विभाग प्रमुखांवर कारवाई का करीत नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस दिली होती. तद्नंतर त्यांना ताकीद सुद्धा देण्यात आली. यावर समितीने सबंधितांना विदित केले की, समिती विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी समितीसमोर असे विशद केले की, संबंधित विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस दिली होती. परंतु त्यांनी जो खुलासा सादर केला त्यावरून यामध्ये विभाग प्रमुखांची काही चूक नसल्याचे निदर्शनास आले. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, लेखा परीक्षण अहवाल जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची जबाबदारी कोणाची होती, सदरहू अहवाल सर्वसाधारण सभेपुढे का ठेवण्यात आला नाही आणि त्यास कोण जबाबदार आहे, हा मूळ मुद्दा आहे. शासन निदर्शनास आणून देते की, विभाग प्रमुखांवर इतरही ब-याच कामाची जबाबदारी असते. त्यामुळे विभाग प्रमुखांनी लेखा परीक्षण अहवालाचे काम त्यांच्या अखत्यारीत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांकडे सोपविले होते. ज्यांच्याकडे हे काम सोपविण्यात आले होते त्यांनी या संदर्भातील नस्ती विभाग प्रमुखांकडे सादर केली नाही. एकप्रकारे ज्यांच्यावर हे काम सोपविण्यात आले होते त्यांनी त्यांच्या कामात दिरंगाई केली. जर त्यांनी सदरहू नस्ती विभाग प्रमुखांकडे सादर केली असती आणि विभाग प्रमुखांनी त्यावर काहीच कार्यवाही केली नसती तर समिती म्हणते त्यानुसार विभाग प्रमुखांवर कारवाई करण्यात आली असती. परंतु या प्रकरणी सकृतदर्शनी असे दिसून येते की, वरिष्ठ सहायकांनी सदरहू नस्ती योग्य त्या निर्णयासाठी विभाग प्रमुखांकडे सादर केली नाही. त्यामुळे विभाग प्रमुखांना या प्रकरणी निर्णय करता आला नाही.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ज्यांच्याकडे काम सोपविण्यात आलेले आहे त्यांनी ते काम केले की नाही हे पाहण्याची जबाबदारी विभाग प्रमुखांची नव्हती काय. चौकशी समितीने या प्रकरणी तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांच्यावर कारवाई प्रस्तावित केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वर्ग-१ दर्जाच्या अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देणे हे चुकीचे नाही काय, मुख्य कार्यकारी अधिका-यांना वर्ग-१ दर्जाच्या अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे अधिकार आहेत काय. चौकशी समितीने अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे की, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांच्याविरूद्ध शिस्तभंग विषयक कारवाई महिला व बालविकास विभागाकडे प्रस्तावित करावी. असे असतांना मुख्य कार्यकारी अधिकारी परस्पर स्वतःच्या स्तरावर वर्ग-१ दर्जाच्या अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्याकडून आलेला खुलासा मान्य करतात, ही कोणती पद्धत आहे. समितीला वाटते यावर आता अधिक चर्चा न करता संबंधित विभाग प्रमुखांवर किती दिवसांत कारवाई करण्यात येईल. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, संबंधित विभाग प्रमुखांकडे वरिष्ठ सहायकांकडून नस्तीच सादर करण्यात आली नसल्यामुळे विभाग प्रमुखांना त्या प्रकरणी पुढील कार्यवाही करता आली नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिल्यानुसार विभाग प्रमुखांनी ज्यांच्याकडे हे काम सोपविले होते त्यांच्याकडून या प्रकरणी आढावा घ्यावयास पाहिजे होता. वास्तविक पाहता विभाग प्रमुख हे आपल्या अखत्यारीत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांची आठवड्यातून किंवा १५ दिवसांतून एकदा आढावा बैठक घेत असतात.

समितीने विचारणा केली की, विभाग प्रमुखांनी लेखा परीक्षण आक्षेप येण्यापूर्वी वरिष्ठ सहायकांनी नस्ती सादर न केल्याप्रकरणी त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती काय. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, जोपर्यंत लेखा परिक्षण होत नाही तोपर्यंत विभाग प्रमुखांपर्यंत हा मुद्दाच जात नाही.

समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षणाची कार्यवाही करण्यासाठी जिल्हा परिषदेला तीन वेळा संधी दिल्यानंतर समन्वय साधून आवश्यक त्या बाबींचा पूर्तता करण्याची जबाबदारी विभाग प्रमुखांची होती. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, कोणाकडे

कोणते काम सोपविले आहे या बाबत सात दिवसांनी किंवा १५ दिवसांनी बैठक घेऊन विभाग प्रमुखांकडून कामाचा आढावा घेण्यात येतो. ज्यांच्याकडे काम सोपविण्यात आले त्यांच्याकडे ते प्रलंबित असेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येते.

समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांचे नेमके कोणते अधिकार आहेत हे जिल्हा परिषदेच्या कायद्यामध्ये नमूद केलेले आहेत. त्यानुसार त्यांच्या अखत्यारीत असलेल्या विषयाला तांत्रिक मंजुरी देणे तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या कर्मचा-यांचे मुल्यामापन करणे, हे विभाग प्रमखांचे अधिकार आहेत. आपल्या अधिनस्त असलेल्या कर्मचा-यांचे मूल्यमापन करताना ही बाब विभाग प्रमखांच्या निदर्शनास का आली नाही. तसेच ही बाब विभाग प्रमुखांच्या निदर्शनास येऊन सुद्धा त्यांनी संबंधितांवर कोणतीच कारवाई केली नाही. त्यामुळेच या संपूर्ण प्रकरणी संबंधित विभाग प्रमुखांवर कारवाई अपेक्षित आहे. अशी समितीने नाराजी व्यक्त करून मत व्यक्त केले की, तत्कालिन विभाग प्रमुखांवर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच विभागीय आयुक्तांनी जो चौकशी अहवाल सादर केला त्यांच्याशी विभागीय सचिव सहमत आहेत काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी आयुक्तांच्या चौकशी अहवालाशी सहमत असल्याचे नमूद केले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, व असे निर्देश दिले की, विभागीय आयुक्तांनी चौकशी अहवाल सादर केला आहे. त्या अहवालाच्या अनुषंगाने जबाबदार अधिका-यांवर कारवाई झाली पाहिजे या बाबींशी विभाग सचिव देखील सहमत आहेत. याप्रकरणी तत्कालिन विभाग प्रमुख हे कारवाईस पात्र आहेत, हे विभागीय सचिवांना मान्य आहे की नाही. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

तद्नंतर समितीने सदर प्रकरणी मत व्यक्त केले की, या प्रकरणी तत्कालिन विभाग प्रमुख हे कारवाईस पात्र असल्याचे विभागाच्या सचिवांनी मान्य केले असल्यामुळे तसेच सन्मानिय समिती सदस्यांच्या भावना लक्षात घेता, संबंधित विभाग प्रमुखांवर नियमानुसार तात्काळ कारवाई होणे अपेक्षित आहे. समिती विचारू इच्छिते की, या प्रकरणी संबंधित विभाग प्रमुखांवर किती दिवसांत कारवाई करण्यात येईल. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, समितीने सुचविल्यानुसार यामध्ये विभाग प्रमुखांचे ढिसाळ पर्यवेक्षण आढळून येत असल्यामुळे विभागीय आयुक्तांच्या चौकशी अहवालानुसार मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विभागाकडे एक आठवड्यात कारवाई प्रस्तावित करावी. पुढे समितीने निदेश दिले की, एक आठवड्यानंतर केलेल्या कारवाईबाबतची माहिती समितीला तात्काळ सादर करावी.

**अभिप्राय व शिफारशी**

मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षण अधिनियम, १९३० चे कलम १०(१) नुसार जिल्हा परिषद जालनाच्या सन २०१३-२०१४ च्या स्थानिक निधी लेखा परीक्षण अहवालावरील जिल्हा परिषेदेच्या सर्व विभागांच्या अनुपालन अहवालास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता शासनाकडे परस्पर अनुपालन अहवाल पाठविण्यातआल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

समितीच्या निदेशानुसार यासंदर्भातील विभागीय आयुक्त यांच्या चौकशी अहवालामध्ये जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने अनुपालन अहवाल सर्वसाधारण सभेची मान्यता न घेतल्याने व लघु पाटबंधारे विभागाने ४ महिन्याच्या विलंबाने तसेच बांधकाम विभागाने १ महिन्याच्या विलंबाने अनुपालन अहवाल सादर केल्याने तीनही विभागातील जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात आली.

समितीसमोरील साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी समितीस विभागीय आयुक्तांच्या चौकशी अहवालानुसार व समितीच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आली असून त्यानुषंगाने तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद जालना यांचेविरूध्द जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांनी सादर केलेल्या खुलाशानुषंगाने या प्रकरणी त्यांची चूक नसल्याचे ग्राह्य धरून विभागातील वरिष्ठ सहाय्यकांना दोषी ग्राह्य धरून तत्सबंधात नस्तीच सादर न केल्याने त्यांच्यावर " सक्त ताकीद दिल्याची " कारवाई करण्यात आल्याचे समितीस अवगत केले.

**ज्यावेळी लेखा आक्षेप निघाला त्यावेळी सदरहू अनुपालन अहवालास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली किंवा नाही याची मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उप मुख्य कार्यकारी, महिला व बालविकास यांनी खातरजमा करून कार्यवाही करणे अपेक्षित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतःचे अधिकारक्षेत्र व जबाबदारीची जाण ठेवून उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास विभाग याच्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरच संबंधितांचा खुलासा स्वीकार करून नियमबाह्य व मनमानीपणे प्रकरण निकाली काढणे ही बाब अधिकाराचा गैरवापर करणे तसेच मंत्रालयीन विभागाच्या अधिकारात अधिक्षेप असल्याचे समितीचे अभिप्राय आहे. यासंदर्भात समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून यानुषंगाने सबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समज देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**साक्षी दरम्यान या प्रकरणी विभागीय आयुक्तांनी केलेल्या चौकशी अहवालानुसार जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्याची तसेच विभाग प्रमुखांचे ढिसाळ पर्यवेक्षण दिसून येत असल्याने तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास विभाग यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रस्ताव मंत्रालयीन विभागाकडे एक आठवड्याच्या आत पाठविण्यात येण्याबाबत प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी निर्देशित केले. त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठवावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण तीन

## **जिल्हा परिषद, जालना (प्रशासन)**

### **जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शासन मान्यताप्राप्त महात्मा फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह मंठा जिल्हा जालना**

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत जालना जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींबाबत मत व्यक्त करून संबंधितांना निदेश दिले की, जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शासन मान्यता प्राप्त, महात्मा फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, मंठा, जि. जालना येथील किचनची अवस्था वाईट आहे, मुलांना फक्त वरण, पोळी व भात दिला जातो. भाजी दिली जात नाही. चपातीचे पीठ चाळले जात नाही, चपाती कच्ची असते. नेहमी भाजीमध्ये अळ्या निघतात, जेवणात अळ्या असतात, अशा तक्रारी मुलांनी केलेल्या आहेत. येथे १०० मुलांची पटसंख्या दिसत असली तरी प्रत्यक्ष २५ मुले हजर होती, बोगस संख्या दाखविण्यात आली आहे. मुलांना साबण, तेल दिले जात नाही. तसेच शिक्षक तेथे उपस्थित राहात नाहीत. समितीने दुस-या मजल्यावरील टेरेसवरील टाकीची पाहणी केली असता तिथे अस्वच्छता आढळली. मुलांना पिण्यास व कपडे धुण्यास एकच पाणी आहे व ते अस्वच्छ आहे. संडास ब्लॉक झाल्यामुळे ८ दिवसापासून बंद आहेत. संडास बाथरुममध्ये लाईट नाहीत. याच संस्थेची दुसरीकडे शाळा आहे व त्यांचे हे वसतीगृह आहे. या संस्थेकडून भाडे अनुदान मोठ्या प्रमाणावर उचलले जाते. समाजकल्याण अधिका-यांनी या शाळेकडे दुर्लक्ष केले आहे. या संस्थेवर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, सदर वसतीगृह बंद करण्यात यावे व याबाबत प्रधान सचिव, समाजकल्याण विभाग यांची साक्ष आयोजित करण्यात यावी, असे समितीने मत व्यक्त केले.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शासन मान्यता प्राप्त महात्मा फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहाला पंचायती राज समितीने भेट दिली असता या वसतीगृहामध्ये १०० मुलांची पटसंख्या असतांना प्रत्यक्षात २५ मुले हजर असणे इतर ७५ मुलांची बोगस संख्या दाखविण्यात येणे, मुलांना पुरविण्यात येणारे दैनंदिन आवश्यक साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असणे, पिण्याची पाणी अत्यंत अस्वच्छ व पिण्यायोग्य नसणे, शौचालयाची संख्या कमी असणे, लाईट, पाणी या सुविधा नसणे या प्रकरणी संबंधित समाज कल्याण अधिका-याची जबाबदारी निश्चिती करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. तसेच सदर वसतीगृहातील विद्यार्थ्यांना इतरत्र सामावून उपरोक्त संस्था तात्काळ बंद करण्याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शासन मान्यताप्राप्त महात्मा फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह मंठा जिल्हा जालना येथे पंचायती राज समिती यांचे प्रत्यक्ष भेटीतील त्रुटी व उणिवाबाबत विभागाने खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे :—

(१) विभागाने कारणे दाखवा नोटीस क्रमांक जिपजा/सकवि/कादानो/अनुवगृहे/१८-१९/९९२ दिनांक २६ सप्टेंबर २०१८ अन्वये नोटीस बजविण्यात आली. त्यावर संस्थेने त्यांचे पत्र क्रमांक १० दिनांक २९ सप्टेंबर २०१८ अन्वये विभागास कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर केला.

(२) संस्थेचा खुलासा समाधानकारक नसल्याने अमान्य करण्यात येवून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांचे आदेश क्रमांक जिपजा/सकवि/अनुवगृहे/ रद्दमान्यता / १८-१९/१०२३/ दिनांक ४ ऑक्टोबर २०१८ नुसार सदर वसतिगृहाची मान्यता रद्द करण्यात आली आणि वसतिगृहातील उपस्थित विद्यार्थीचे खालील वसतिगृहामध्ये या कार्यालयाचे आदेश क्रमांक जिपजा/सकवि/अनुवगृहे/ कार्योत्तर मान्यता/१८-१९/१०२४ दिनांक ४ ऑक्टोबर २०१८ नुसार समायोजन करण्यात आले आहे.

अ. रामबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, गोसावी पंगारी, ता. परतूर, जि. जालना संचालित स्वामी विवेकानंद वसतिगृह परतूर १५ विद्यार्थी.

ब. सुजाता शिक्षण प्रसारक मंडळ, संचालित नालंदा मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह, परतूर १० विद्यार्थी.

क. संत श्री. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ज्ञानदीप शिक्षण संस्था, दहिफळ (खं) ता. मंठा संचालित ज्ञानदीप विद्यार्थी वसतिगृह, बेलोरा, मा. मंठा जिल्हा जालना १० विद्यार्थी.

(३) वसतिगृहाच्या मान्यता रद्द आदेशास संस्थेने मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई येथे अपील दाखल केले. सदर अपीलावर मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, विभाग मुंबई यांनी दिनांक ७ फेब्रुवारी २०१९ रोजी सुनावणी

घेवून त्यांचे आदेश क्रमांक अपील-२०१९ /प्र.क्र.९ / शिक्षण -२ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मुंबई-३२ दिनांक २२ मार्च २०१९ अन्वये निर्णय दिला. ज्या निर्णयाद्वारे विभागाने वसतीगृहाची रद्द केलेली मान्यता आदेश कायम ठेवले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय:-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**२. ग्रामविकास विभागाचे अभिप्राय:-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ०६ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शासन मान्यताप्राप्त महात्मा फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह मंठा, जि.जालना या वसतिगृहामध्ये १०० मुलांची पटसंख्या असताना प्रत्यक्षात २५ मुले हजर असणे, इतर ७५ मुलांची बोगस संख्या दाखविण्यात येणे, मुलांना पुरविण्यात येणारे दैनंदिन आवश्यक साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असणे, पिण्याचे पाणी अत्यंत अस्वच्छ व पिण्यायोग्य नसणे, शौचालयाची संख्या कमी असणे, शौचालयात लाईट, पाणी या सुविधा नसणे या प्रकरणी संबंधित समाजकल्याण अधिका-यांची जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा, असे जिल्हा परिषदेस कळविले होते. याबाबत केवळ खुलासा सादर केला असे नमूद केले आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या दौ-यात व साक्षीच्या वेळी हा विषय येतो. १०० पैकी २५ मुले हजर होती, ७५ मुले हजर नाहीत. याबाबत आपण कोणती कारवाई केली आहे. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विशद केले की, त्या वसतिगृहाच्या संस्थेला शासनाने नोटीस बजावली आहे. त्यांचा खुलासा असमाधानकारक आढळला आहे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या वसतिगृहाची मान्यता रद्द केली. या विरूद्ध संस्थाचालकांनी शासनाकडे अपील दाखल केले होते. त्यावर देखील सुनावणी घेतली व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा मान्यता रद्द करण्याचा आदेश कायम ठेवला आहे. सध्या ती संस्था उच्च न्यायालयात गेली आहे. तसेच या संस्थेची मान्यता रद्द आहे. यावर समितीने विचारणा केली की, या संस्थेचे बोगस काम किती दिवसांपासून सुरू होते. संस्थेने शासनाची फसवणूक केली आहे, त्यांच्याकडून वसूली केली आहे का, कारण १०० पैकी ७५ मुलांचे अनुदान त्यांनी किती वर्षे लाटले आहे याची सविस्तर चौकशी झाली आहे का, तसेच जिल्हा परिषदेच्या अधिका-यांनी या वसतिगृहास भेटी देऊन त्यांचे काम समाधानकारक असल्याचे अभिप्राय दिलेले आहेत. केवळ पंचायती राज समितीसमोर मुद्दा आला म्हणून आपण कारवाई करीत आहात. याबाबत समाजकल्याण विभागाची काही जबाबदारी आहे की नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, संबंधित अधिका-यांनी पंचायती राज समितीच्या दौ-यापूर्वीच त्या संस्थेला याबाबत कारणे दाखवा नोटीस दिलेली होती. त्या संस्थेचे काम व्यवस्थित चालू नसल्याने त्यांचे अनुदानाचे हप्ते बंद केले होते. समितीच्या दौ-यानंतर त्या संस्थेची मान्यता रद्द केली आहे. पुढे समितीने विचारणा केली की, तत्पूर्वी तेथे काही अधिका-यांचे अभिप्राय होते की, त्या संस्थेचे कामकाज चांगले आहे. खालच्या स्तरावर असे व्हायला नको. समितीच्या दौ-यापूर्वी किती महिने आधी तेथील अनियमितता तुमच्या लक्षात आली होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, तीन महिने अगोदर ही बाब लक्षात आली होती, यावर समितीने विचारणा केली की, हा केवळ दोन द्व तीन महिन्याचा विषय नसून वर्षभराचा विषय आहे, याचा अर्थ आपल्या अधिका-यांनी तेथे तपासणी करून चुकीच्या पद्धतीचा अहवाल सादर केलेला आहे. तुम्ही एका महिन्याचे रेकॉर्ड पाहिले होते. यावर प्रधान सचिव, समाजकल्याण व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विशद केले की, त्यांचे मागील वर्षाच्या तपासणी अहवालाचा पुर्नविचार करीत आहोत यामध्ये उणीवा असतील तरीही समाधानकारक शेरा दिला असेल तर संबंधित अधिका-यावर शासन कारवाई प्रस्तावित करेल. तसेच तेथील मुलांना तीन वसतिगृहात स्थानांतरीत केलेले आहे. पुढे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, रामबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, गोसावी पांगरी, ता. परतूर जि.जालना संचलित स्वामी विवेकानंद वसतिगृह परतूर येथे १५ विद्यार्थी, सुजाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नालंदा मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह परतूर येथे १० विद्यार्थी, संत श्री. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ज्ञानदीप शिक्षण संस्था दहिफळ खं, ता.मंठा, संचलित ज्ञानदीप विद्यार्थी वसतिगृह बेलोरा, ता. मंठा जि.जालना येथे १० विद्यार्थी अशा वसतिगृहात मुलांना स्थानांतरीत केले आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, महाराष्ट्रात अशा प्रकारची स्थिती कोणकोणत्या ठिकाणी आहे. यावर प्रधान सचिव, समाजकल्याण व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विशद केले की, समितीच्या निदर्शनास याबाबी वांरवार आल्या आहेत, मंत्री महोदयांनी याबाबत वारंवार बैठकाही घेतल्या आहेत. अनुदानित वसतिगृहाचा त्यांनी विशेष आढावा घेतला आहे. अनेक जिल्ह्यात याकरीता पथके आहेत. शासनाने सध्या अमरावती विभागाची निवड याकरीता केली आहे. येथील संपूर्ण वसतिगृहाची तपासणी फ्लाइंग स्कॉड स्थापन करून केलेली आहे. दुस-या टप्प्यात मराठवाडा विभाग घेणार आहोत.

## अभिप्राय व शिफारशी

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शासन मान्यताप्राप्त महात्मा फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, मंठा, जिल्हा जालना येथे समितीने भेट दिली असता समितीला वसतिगृहामध्ये १०० मुलांची पटसंख्या असतांना प्रत्यक्षात २५ मुले हजर व ७५ मुलांची बोगस संख्या दाखविण्यात आल्याचे, मुलांना पुरविण्यात येणारे दैनंदिन साहित्य निकृष्ट दर्जाचे, अस्वच्छता व इतर सोयी-सुविधांचा अभाव इत्यादी बाबी समितीच्या निदर्शनास आल्या.

समितीने दिलेल्या निर्देशास अनूसरून सदरहू आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यात आली असून संस्थेने विभागीय सचिव यांचेकडे केलेले अपिल फेटाळण्यात आल्याचे तसेच यासंदर्भात उच्च न्यायालयाकडे प्रकरण प्रलंबित असल्याचे साक्षीदरम्यान विभागीय सचिव यांनी समितीच्या निदर्शनास आणले. तसेच विद्यार्थांना इतर आश्रमशाळांमध्ये सामावून घेण्यात आले असल्याचे तसेच सदरहू आश्रमशाळेसंदर्भात वस्तुस्थितीजन्य अहवाल न देता चुकीचा तपासणी अहवाल दिल्याचे उघडकीस आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

सदरहू आश्रमशाळेची मान्यता रद्द केल्याने एकूण ३५ विद्यार्थ्यांचे तीन आश्रमशाळांमध्ये समायोजन करण्यात आले असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

**आश्रमशाळा बंद झाल्यानंतर तेथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या समायोजनाबाबत अनेक अडचणी उद्‌भवत असल्याचे तसेच वर्षोनवर्षे त्याचे समायोजन न झाल्याने संबंधित कर्मचा-यांवर पर्यायाने त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची पाळी येते. अशा परिस्थितीत संबंधित संस्थाचालक आश्रमशाळा चालविण्यास असमर्थ असेल किंवा इतर कारणांमुळे आश्रमशाळेची मान्यता रद्द होणे अपरिहार्य असेल तर ती आश्रमशाळा इतर शासकीय आश्रमशाळेप्रमाणे शासनास स्वतः चालविता येईल व या सर्व विद्यार्थी तसेच कर्मचारी यांच्या समायोजनाचा प्रश्न उद्‌भवणार नाही व उपलब्ध इमारत व इतर साधनसामुग्रीचाही उपयोग चालू राहील याबाबत शासन स्तरावरून गंभीरतेने कार्यवाही करण्यात यावी व त्याअनुषंगाने संबंधित अधिनियम व नियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात, अशी समितीची शिफारस आहे.**

**सदरहू आश्रमशाळेतील अनागोंदी कारभार मागील अनेक दिवसापासून सुरू असतांना पंचायती राज समितीच्या भेटीनंतर या प्रकरणी कारवाई करण्यात आली. या आश्रम शाळेतील गलिच्छ व नियमबाह्य कारभार व अपु-या व निकृष्ठ दर्जाच्या सोयीसुविधांची झळ व यातना तेथील विद्यार्थ्यांना सोसावी लागली. यापूर्वी समाजकल्याण विभागाच्या तपासणी करणा-या अधिका-यांनी त्यांच्या अहवालामध्ये या बाबींचा समावेश केला होता किंवा नाही तसेच अहवालात या बाबींचा समावेश केल्यानंतर त्यानुषंगाने वेळीच कारवाई का केली गेली नाही याची चौकशी करण्यात यावी व जबाबदार अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी, तसेच चौकशी अहवालात या बाबींचा समावेश केला नसल्यास तपासणी अधिका-यांवरही कारवाई करण्यात येईल असे समितीस आश्वासित केल्याप्रमाणे कार्यवाही व्हावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, जालना (प्रशासन)

### वॉटर ग्रीडच्या कामामध्ये विकास शुल्क भरून न घेण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत जालना जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, समितीने परतूर लगतच्या ग्रीड पाणीपुरवठा योजनेस भेट दिली असता, त्या ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत १७६ गावांसाठी २३४ कोटी रुपयांची योजना सुरू केली आहे ही पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषदेची असली तरी ती कशी व्यवहार्य (फिजीबल) होईल या दृष्टिकोनातून सर्व ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदेचा ठराव झाला आहे. या योजनेतून १७६ गावांना पाणी मिळणार असले तरी ही योजना पूर्णत्वास जात असताना ग्रामपंचायतीचे व जिल्हा परिषदेचे रस्ते खोदण्यात आल्यामुळे ते खराब झाले आहेत. १७६ गावांसाठी ही योजना सुरू आहे. त्या भागातील जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांनी समितीची भेट घेऊन निदर्शनास आणून दिले की, त्या भागात ५०५४ या लेखाशीर्षांतर्गत ओडीआर खाली एक रुपया सुद्धा निधी मिळालेला नाही. त्या भागातील सर्व रस्ते खोदून पाईप लाईन टाकली जात आहे. मोबाईल कंपनी किंवा अन्य कोणत्याही कंपनीला आपल्या केबल टाकावयाच्या झाल्यास ते अंदाजपत्रकात खोदकामामुळे खराब झालेले रस्ते दुरुस्त करून देण्यासाठी लागणा-या खर्चाचा समावेश करुन अंदाजपत्रक सादर करीत असतात. सदरहू योजनेचे पाईप लाईन भूमिगत टाकण्यात येणार असल्यामुळे रस्ते पूर्ववत करुन देण्यासाठी डेव्हलपमेंट चार्जेसचा समावेश करुन पुरेशा निधीच्या तरतूदी संदर्भात समितीने माहिती घेतली असता सदरहू योजनेचे काम करण्यापूर्वी संबंधित यंत्रणेने डेव्हलपमेंट चार्ज म्हणून जिल्हा परिषदेकडे रक्कम भरल्याचे निदर्शनास आलेले नाही. सदरहू योजनेचे पाईप लाईन टाकल्यामुळे जे रस्ते खराब होणार आहेत त्याची दुरुस्ती जिल्हा परिषद करुन देणार आहे की महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करणार आहे. वास्तविक पाहता सदरहू योजनेचे काम सुरु झाल्यानंतर जिल्हा परिषदेने स्वतःहून या संदर्भातील प्रक्रिया पार पाडणे आवश्यक होते. सदरहू योजनेच्या खोदकामामुळे खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती कशी करणार या बाबतची विचारणा महाराष्ट्र जिवन प्राधिकारणाकडे करावयास पाहिजे होती. मुळात एमजेपीने डेव्हलपमेंट चार्ज भरावयास पाहिजे होता. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण पंरतु त्यांच्या अंदाजपत्रकामध्ये डेव्हलपमेंट चार्जेस नमूद केले आहेत की नाही, याची माहिती नाही. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या योजनेच्या खोदकामामुळे जिल्हा परिषदेचे जे रस्ते खराब होणार आहेत त्यांची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा असा प्रस्ताव जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केला आहे काय. आजच्या घडीला त्या योजनेचे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी या प्रकल्पाला भेट दिली आहे. असे समितीला अवगत करण्यात आले असता, समितीने विचारणा केले की, गावातून पाईप लाईन टाकल्यामुळे किती रस्ते खराब झाले याची माहिती आपण घेतली आहे काय, जिल्हा परिषद स्वतःच्या उत्पन्नातून खोदकामामुळे खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्यासाठी सक्षम आहे काय. वास्तविक पाहता जिल्हा परिषद अगोदरचे खराब झालेले रस्ते दुरुस्त करु शकत नाही, अशा परिस्थितीत खोदकामामुळे खराब झालेले रस्ते कसे दुरुस्त करणार. जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांची लांबी किती आहे. उदाहरणार्थ जिओ कंपनीची मोबाईल लाईन टाकावयाची असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतले जाते. जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जिवन प्राधिकारणाला अशा प्रकारची ना-हरकत प्रमाणपत्रे दिली आहेत काय, विकासात्मक योजना राबवावयाची असली तरी करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये स्पष्टपणे नमूद असते की, योजनेचे काम झाल्यानंतर जी काही दुरुस्तीची कामे असतील ती संबंधित यंत्रणेने करुन द्यावीत. परंतु अशा प्रकारच्या अटी व शर्ती नमूद न करता ना-हरकत प्रमाणपत्र देणारे अधिकारी यात दोषी आहेत. त्यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिली नसती तर पुढील कार्यवाही झाली नसती. जिल्हा परिषदेच्या रस्त्याची नादुरुस्ती होणार असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवावयास पाहिजे होता की, सदरहू योजनेची पाईप लाईन टाकल्यामुळे रस्त्याची जी हानी होईल त्यासाठी विकास शुल्काच्या माध्यमातून निधी राखून ठेवण्यात येईल. याकडे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी लक्ष द्यावयास पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी हे प्रकरण तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन समितीला दिले.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. एका पाणीपुरवठा योजनेच्या खोदकामामुळे १७६ गावातील रस्ते खराब होत आहेत. या संपूर्ण प्रकरणी तत्काळ विनाविलंब सखोल चौकशी झाली पाहिजे. तसेच ज्यांच्या हलगर्जीपणामुळे रस्ते खराब होत आहेत त्या अधिका-यांवर कारवाई करावयास पाहिजे. नियमानुसार जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विकासशुल्क भरून घ्यावयास पाहिजे होता. समितीला अशी शंका येते की, विकासशुल्क भरून न घेता, अधिकारी परस्पर संबंधित खाजगी कंपनी वा यंत्रणेकडून पैसे घेत आहेत. जे अधिकारी गैरमार्गाने स्वतःची तिजोरी भरुन शासनावर भुर्दंड पाडत असतील त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे. या प्रकरणी पाणीपुरवठा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल. तसेच सदरहू योजनेच्या खोदकामामुळे खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावयास पाहिजे. तसेच या योजनेमुळे किती रस्ते खराब झाले याचा तपशील सादर करावयास पाहिजे.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

परतूर लगतच्या ग्रीड पाणीपुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत १७६ गावांसाठी २३४ कोटी रुपयांची योजना सुरू करण्यात आली आहे. तथापि, सदर योजना पुर्णत्वास जात असतांना ग्रामपंचायतीचे व जिल्हा परिषदेचे रस्ते खोदण्यात आल्यामुळे खराब झालेले आहे नियमानुसार जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून विकासशुल्क (डेव्हलपमेंट चार्ज) भरून घेण्यात आले नाही. या प्रकरणात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास चौकशीनुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरुद्ध केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—

परतूर लगतच्या ग्रीड पाणीपुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत १७६ गावांसाठी २३४ कोटी रुपयांची योजना सुरू असून सदर कामे सुरू असतांना जिल्हा परिषदेची इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग हे रस्ते खोदण्यात आलेले नाही. तथापि, ग्रामपंचायत हद्दी मध्ये असलेले अंतर्गत रस्ते खोदण्यात आल्याचे आढळून आले आहे. ग्रामपंचायत अंतर्गत रस्ते ही मालमत्ता सर्वस्वी ग्रामपंचायत मालकीची आहे. त्यामुळे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग परतूर कडून त्यात हस्तक्षेप करण्यात आला नाही. जिल्हा परिषदेचे इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्ते खोदण्यात आले नसल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विकास शुल्क भरून घेण्यात आले नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून किती रस्त्यावर खोदकाम केले याबाबत अहवाल मागविला असून त्यानुसार जिल्हा परिषदेकडे विकास शुल्क भरूण घेण्याचे पत्र क्र. ८१६ दिनांक ३१ जुलै २०१९ रोजी या कार्यालयांनी दिले आहे. यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जिल्हा परिषदेचे रस्ते इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग खोदावयाचे असल्यास नियमाप्रमाणे विकासशुल्क भरून घेण्यात येईल.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**१. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** संबंधित नाही.

**२. ग्रामविकास विभागाचे अभिप्राय:-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ६ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विशद केले की, जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यात २३४ गावांच्या पाणीपुरवठा योजनेचे बांधकाम सुरू असून १३४ कोटी रुपयांची ही योजना आहे. पाईपलाईनच्या क्रॉसींगकरिता रस्ते खणले, खराब केले व त्याची दुरुस्ती केली नाही. पैसे भरले नाही अशी तक्रार आहे. शासनाने या बाबत चौकशी केली. कोणतेही रस्ते खराब झालेले नाही. रस्ते तोडलेच नव्हते. ग्रामपंचायत क्षेत्रात पाईपलाईनकरिता रस्ता खोदकाम करावे लागते ते रस्ते खणल्यानंतर दुरुस्त केले आहेत.

### अभिप्राय व शिफारशी

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यामातून जालना जिल्ह्यातील परतूर येथे १७६ गावांसाठी २३४ कोटी रुपये रकमेची पाणीपुरवठा योजना राबविण्यात येते आहे. सदरहू पाणीपुरवठा योजनेंतर्गत कामे करतांना ग्रामपंचायतीचे व जिल्हा परिषदेचे रस्ते खोदण्यात आल्यामुळे व निधी अभावी खोदकामांची दुरूस्ती न झाल्यामुळे रस्ते खराब अवस्थेत असल्याचे तसेच नियमानुसार जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून विकासशुल्क वसूल केले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

समितीसमोरील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी जिल्हा परिषदेचे इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग हे रस्ते खोदण्यात आलेले नाही. ग्रामपंचायत हद्दी अंतर्गत रस्ते खोदण्यात आले असून त्याची दुरूस्ती झाल्याचे समितीला अवगत केले. यानुषंगाने सदरहू योजनेकरता केलेले खोदकाम ग्रामपंचायत हद्दीतील असल्याने जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून विकासशुल्क वसुल केले नसल्याचेही समितीस अवगत झाले.

**ग्रामीण पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या त्रिस्तरिय व्यवस्थेमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजाच्या बाबतीत वेगवेगळे अधिकारक्षेत्र असले तरीही जिल्हा परिषदेचे ग्रामपंचायत व पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थावर सर्वसाधारण नियंत्रण असल्यामुळे तसेच प्रशासकीय बाबी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याच अख्त्यारीत असल्याने ग्रामस्तरावर पाणीपुरवठा योजना राबवितांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून नियमानुसार विकासशुल्क आकारण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची होती. तसेच सदरहू पाणीपुरवठा योजना परतूर परिसरातील १७६ गावांकरीता राबविण्यात येत असल्याने योजनेंतर्गत कामे करतांना जिल्हा मार्ग व इतर ग्रामीण मार्गाचे खोदकाम करण्यात आले नाही व केवळ ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांचे खोदकाम करण्यात आले असे म्हणणे हे वस्तुस्थितीला धरून नसल्याचे समितीचे मत आहे.**

**सदरहू पाणीपुरवठा योजना राबवितांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून विकासशुल्क वसुल केले गेले नाही. खोदलेले रस्ते वेळीच दुरूस्त न झाल्याने त्यांची झळ परतूर परिसरातील १७६ गावांतील नागरिकांना बसली ही वस्तूस्थिती आहे. ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत राबविण्यात आली असून जिल्हा परिषदेमार्फत विकासशुल्क का आकारले गेले नाही याची शहानिशा करण्यात येऊन आवश्यकता भासल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करण्यात यावी तसेच विकास शुल्काची वसुली करण्यासंदर्भात कार्यवाही व्हावी, यामध्ये कोणकोणते रस्ते बाधित झाले याची देखील चौकशी करून त्याबाबतचा चौकशी अहवाल चौकशी समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, जालना (प्रशासन)

### अवैध गौण खनिज उत्खननाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत जालना जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, परतूर तालुका परिसरात हायवेचे काम सुरू आहे. त्या भागात गौण खनिजाच्या वाहतुकीमुळे त्या भागातील जिल्हा परिषदेचे ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग खराब होत आहेत. अतिरिक्त जिल्हाधिकारी आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना बैठकीला उपस्थित राहण्याबाबत सुचविण्यात आले होते. चोरी करणा-याला शासनाने एका ब्रासमागे १ लाख १० हजार रुपये इतका दंड आकारला आहे. ग्रामीण भागात कोणत्याही ग्रामपंचायतीला गौण खनिजाची त्यांच्या हिश्श्याची रक्कम मिळत नाही. ठेकेदार मंडळी मोठमोठी कामे करतात. वास्तविक पाहता त्या विभागाने जिल्हाधिका-यांकडे मागणी करावयास पाहिजे की, त्यांना अमुक गौण खनिज लागणार आहे. तसेच प्रमाणित केलेल्या क्वॉरीमधून गौण खनिज उचलावयास पाहिजे. परंतु कोणत्याही कामावर तसे होत नाही. अनधिकृतपणे गौण खनिजाचे उत्खनन केले जाते. परिणामी ग्रामपंचायतीचा महसूल बुडतो. शिवाय अधिकारी मोठ्या ठेकेदाराकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्यावर कोणताही दंड आकारला जात नाही. स्वतःच्या विहिरीतून मुरुम आणून टाकल्यास त्याला एका ब्रासला १ लाख १० हजार रुपये दंड आकारण्यात येतो. पण या ठिकाणी मात्र अशा प्रकारची गौण खनिजाची सर्रास अवैध वाहतूक होत असताना दंड आकारला जात नाही. या बाबतीत संबंधितांना केवळ पत्र पाठविले जाते. या बाबत अतिरिक्त जिल्हाधिका-यांनी माहिती द्यावी. यावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना यांनी समितीस विशद केले की, गेल्या दोन वर्षात रुपये १२,४६,७६,६४५ इतकी रॉयल्टी जमा करण्यात आली आहे.

समितीने विचारणा केली की, ही रॉयल्टी वैध मार्गाने जमा केली की अवैध मार्गाने जमा केली ? रॉयल्टी देयकातून वसूल केली याचा अर्थ त्यांनी रॉयल्टी भरलेली नव्हती. देयकातून कपात केलेली रॉयल्टी किती आहे ? या जिल्ह्यात प्रत्येक यंत्रणेने करोडो रुपयांची कामे केलेली आहेत. यंत्रणेकडून रॉयल्टीपोटी किती रक्कम जमा झाली आणि विना परवानगीच्या रॉयल्टीचे किती चेक आले. यावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना यांनी समितीस विशद केले की, या संदर्भातील माहिती सध्या त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

समितीने विचारणा केली की, या भागात करोडो रुपयांची अवैध गौण खनिज वाहतूक होत असताना तहसीलदार, महसूल अधिकारी, नायब तहसीलदार इत्यादी मंडळी लिफाफे घेऊन संबंधितांवर गुन्हा दाखल करीत नाहीत, दंड आकारत नाहीत. अवैध उत्खनन केल्यामुळे किती लोकांवर दंडात्मक कारवाई केली किंवा दंड न भरल्यामुळे किती वाहने जप्त केली. कार्यकारी अभियंता (बांधकाम), कार्यकारी अभियंता (एम.जे.पी.), कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), इत्यादी यांनी आपल्याला रॉयल्टीचे थेट किती पैसे दिले. यावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, यांनी समितीस विशद केले की, याबाबतची माहिती सध्या त्यांचेकडे उपलब्ध नाही. परंतु आतापर्यंत सुमारे २ कोटी रुपये आपल्याकडे जमा केले आहेत. सदर माहिती समितीस सादर करण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ५०० ते १ हजार कोटी रुपये किंमतीच्या रस्त्यांची किमान १०० कोटी रुपये तरी रॉयल्टी जमा झाली पाहिजे. केवळ मोघम पत्र न देता रॉयल्टी किती निघते हे तपासून व तसे नमूद करून संबंधितांना पत्र दिले पाहिजे. एखाद्या रस्त्याला लागणारा मुरुम, खडी किंवा इतर गौण खनिजे याच्या अगेन्स्ट किती रॉयल्टी निघते त्यानुसार वसुली केली पाहिजे. यावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, यांनी समितीस विशद केले की, आम्ही संबंधितांना पत्र दिले आहेत. त्यांनी सांगितले की, सध्या पैसे आलेले नाहीत. पैसे आल्यानंतर आम्ही भरु. यावर समितीने विचारणा केली की, दंड म्हणून किंवा अनधिकृत किती रॉयल्टी जमा झालेली आहे. ग्रामपंचायतीच्या हद्दीतून उचलल्या जाणा-या गौण खनिजाच्या बदल्यात ग्रामपंचायतीला पैसेच मिळत नाहीत, हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्षात घ्यावे. यामुळे ग्रामपंचायतींवर अन्याय होत आहे. यावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, यांनी समिती विशद केले की, आपण १० टक्के रक्कम देतो. यावर समितीने विचारणा केली की, जर एखाद्या ग्रामपंचायतीमधून अवैधरीत्या गौण खनिज उचलले व सदर वाहन २५ किमी. अंतरावर पकडून त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली तर ज्या ग्रामपंचायत हद्दीतून सदर गौण खनिज उचलले आहे त्या ग्रामपंचायतीस हक्काचे पैसे मिळतच नाहीत. यावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, यांनी समितीस विशद केले की, यासाठी वेगळी तरतूद करण्यात आलेली नाही.

पुढे समितीने विचारणा केली की, एखाद्या गरीब शेतक-याच्या ट्रॅक्टरवर कारवाई करून त्याला १ लाख १० हजार रुपये दंड ठोठावतात परंतु मोठमोठ्या कंत्राटदारांच्या ठेक्यांवर मात्र कारवाई केली जात नाही. कधी कारणे दाखवा नोटीस इश्यू केली आहे का? यावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, यांनी कारवाई करण्याचे समितीस अवगत केले.

समितीने निदेश दिले की,आपण केवळ मोघम पत्र न देता रॉयल्टी किती निघते हे तपासून व तसे नमूद करुन संबंधितांना पत्र दिले पाहिजे. ग्रामपंचायती सक्षम झाल्या पाहिजेत. यासाठी सर्व ग्रामसेवकांना योग्य त्या सूचना केल्या पाहिजेत. समितीने मांडलेल्या विषयामध्ये गरीब शेतक-यांवर

खूप मोठा अन्याय होत असून मोठे कंत्राटदार मात्र कारवाईतून बाजुला राहत आहेत. या प्रकरणी ग्रामविकास व महसूल विभागांच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येत आहे.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गौण खनिज, मुरूम, खडी इत्यादी उचलल्यास ग्रामपंचायतीस स्वामित्वधनाची रक्कम (रॉयल्टी) भरणा केली जात नाही, त्यामुळे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नावर परिणाम होतो, यासाठी ग्रामपंचायती सक्षम होण्याच्या दृष्टीने अवैधरित्या गौण खनिज उचलल्यास दंडात्मक कारवाई करण्यासाठी स्वामित्वधनाची रक्कम बाबतच्या तरतुदी संदर्भातील सूचना संबंधित ग्रामसेवकांना निर्गमित करण्याबाबत महसूल व ग्रामविकास विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

सदरील मुद्यांच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, याबाबत या जिल्हा परिषदेचे पत्र जा.क्र.जिपजा/पंचा-४/२०१८/२९३३, दि. १/८/२०१८ अन्वये ग्रामपंचायत क्षेत्रातील गौण खनिज अवैधरित्या उचल्यास संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांचे विरुद्ध कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबत सर्व गटविकास अधिकारी यांना सुचित करण्यात आलेले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**१. महसूल विभागाचे अभिप्रायः-** गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी केलेल्या दंडात्मक रक्कमेतून संबंधित ग्रामपंचायतींना निधी देण्याची अधिनियम (कायदा) व नियमांमध्ये कोणतीही तरतूद नाही.

**२. ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-६):-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

सदरहू परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान चर्चा झाली नाही.

**अभिप्राय व शिफारशी**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गौण खनिज, मुरूम, खडीच्या उत्खननासंदर्भात स्वामित्वधन (रॉयल्टी) तसेच अवैध उत्खननातून दंडापोटी शासनास भरमसाठ महसूल प्राप्त होत असतो. ग्रामपंचायतीच्या हद्दीतील तसेच आजूबाजूच्या परीसरातील गौण खनिजांचे उत्खनन व वाहतुकीचा अतिरिक्त भार तेथील ग्रामीण मार्ग तसेच जिल्हा मार्गावर पडत असल्याने सदर रस्ते वारंवार खराब होतात व त्यांची वेळेत दुरुस्ती केली जात नाही. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील पायाभूत सोयीसुविधांवरही त्याचा विपरीत परिणाम होतो. ग्रामपंचायतीचेही उत्पन्न अतिशय तुटपुंजे असल्याने ग्रामीण भागातील रस्त्यांची नेहमी दुर्दशा झालेली असल्याचे तसेच त्याचा विपरीत परिणाम ग्रामवासियांच्या जीवनमानावर होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान गौण खनिज, मुरूम व खडी इत्यादी गौण खनिजांच्या उत्खननातून मिळणारे उत्पन्न तसेच अवैध उत्खननातून दंडापोटी मिळणा-या रकमेतून ग्रामपंचायतींना काही प्रमाणात निधी देण्याचा कायदा व नियमामध्ये तरतूद नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

**ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातून व ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याकरीता व ग्रामवासीयांचे जीवनमान अधिक उंचावण्याकरीता गौण खनिजांच्या उत्खननापासून मिळणारे स्वामित्वधन (रॉयल्टी) व अवैध उत्खननामुळे मिळणा-या दंडापोटी शासनास मिळणा-या उत्पन्नातून काही हिस्सा संबंधित ग्रामपंचायतीला मिळणे नियमानुसार आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे.**

**यानुषंगाने ग्रामपंचायत हद्दीतील किंवा परिसरातील गौण खनिज, मुरूम, खडी इत्यादीच्या उत्खननातून शासनास मिळणा-या महसुलातील तसेच खनिजांच्या अवैध उत्खननामुळे दंडापोटी शासनास मिळणा-या महसुलातील काही हिस्सा सबंधित ग्रामपंचायतीला मिळावा याकरीता आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आंत समितीस पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, जालना (प्रशासन)

### महात्मा गांधी तंटामुक्त अभियानाच्या समितीच्या बैठका घेण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत जालना जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, तंटामुक्ती अभियान गावांशी संबधित आहे. तंटामुक्त गाव जाहीर झाल्यानंतर सदर गावाला बक्षिस देण्यात येते. सदर गाव तंटामुक्त झाल्यानंतर तेथे दारुबंदी झाली पाहिजे. जालना जिल्ह्यामध्ये जी गावे तंटामुक्त झाली तेथे दारुबंदी करण्यात आलेली आहे का तसेच तेथील तंटे पूर्णपणे मिटले आहेत का. याबाबत ग्रामविकास विभागाचा शासन निर्णयदेखील आहे. असे असताना समिती तंटामुक्त गावांमध्ये गेली त्यावेळी तेथे दारु व गुटख्याचा वास येत होता. याबाबत आढावा घेण्यात आला आहे का. दारुमुक्त गाव करण्यासाठी ग्रामस्तरावर ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करण्याबाबत देखील तरतूद करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाचीदेखील अंमलबजावणी झाली पाहिजे. जर एखाद्या गावामध्ये अवैध धंदे सुरू असतील व त्याबाबत ग्रामसुरक्षा दलाने तक्रार दाखल केल्यानंतर पोलीस स्टेशनमधील अधिकारी जर तक्रार दाखल करून घेण्यामध्ये टाळाटाळ करीत असतील तर सदर अधिका-यावर कारवाई करण्याबाबत या शासन निर्णयामध्ये तरतूद केलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी याबाबत बैठक घेण्यात येईल असे समितीस आश्वासीत केले.

समितीने विचारणा केली की, जिल्हास्तरीय कार्यकारी व जिल्हा सल्लागार समित्या आहेत. यातील पहिल्या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी व दुस-या समितीचे अध्यक्ष माननीय पालकमंत्री असतात. पालकमंत्र्यांना वेळ नसतो हे समजू शकतो. परंतु जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या समितीच्या बैठका घेण्यात आल्या आहेत काय? या समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी हे देखील सदस्य आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी सदरहू बैठकीला त्यांना बोलावण्यात न आल्याचे समितीच्या निदर्शनास आणले.

समितीने विचारणा केली की, गाव तंटामुक्त झाले तर विकासाला चालना मिळते व त्यासाठी स्व. आर. आर. पाटील यांनी ही संकल्पना राबविली होती. ज्याप्रमाणे हगणदारीमुक्त गाव योजनेसाठी माननीय पंतप्रधान व माननीय मुख्यमंत्री पाठपुरावा करीत आहेत त्याप्रमाणेच तंटामुक्त गाव योजनेसाठी स्व. आर. आर. पाटील यांनी पाठपुरावा केला होता. यासंदर्भातील जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय समित्यांच्या बैठका वेळेवर होतात का ? जर होत नसतील तर मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने आपण त्यात लक्ष घातले पाहिजे. तंटामुक्त गावांमध्ये दारुबंदी झाली आहे का, तेथील महिलांच्या काही तक्रारी आहेत का हे पाहिले पाहिजे. केवळ शासन निर्णय काढून काम संपले असे होत नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की, याबाबतच्या समित्यांच्या वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेण्याबाबत कार्यवाही करावी. कारण दारु हेच भांडणांचे मूळ असते. तसेच सदर शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांची साक्ष आयोजित करावी.

समितीने निदेश दिले की, सदर विषय अतिशय महत्त्वाचा आहे. याबाबत शासनाने वेगवेगळ्या समित्या गठीत करून देखील त्यांच्या वेळोवेळी बैठका होत नसल्याने त्याचा परिणाम सर्वसामान्यांच्या जीवनावर होतो. शासन निर्णयानुसार ज्यांच्यावर जबाबदारी निश्चित केलेली आहे त्यांनी ती सक्षमपणे पार पाडली पाहिजे. तसेच यामधील व्यापक लोकहित लक्षात घेता यासंदर्भात अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांची साक्ष आयोजित करण्यात येत आहे.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

महात्मा गांधी तंटामुक्त अभियान, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय, ग्रामस्तरीय समित्यांच्या बैठका वेळोवेळी घेऊन आढावा घेण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत शासन निर्णयानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली आहे. त्यानुसार ती सक्षमपणे पार पाडण्यासाठी व्यापक लोकहित लक्षात घेऊन गृह विभागाने व ग्रामविकास विभागाने कोणती कार्यवाही केली आहे. याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

सदरील मुद्यांच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपजा/का.अ./कावि/२०१९/२८३७, दिनांक २९ जुलै, २०१९ अन्वये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम योजनेच्या जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय, ग्रामस्तरीय समित्यांच्या बैठका आयोजन करणेबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम, जालना यांना सादर करण्यात आलेले आहे.

तसेच त्याची प्रत मा. पोलीस अधीक्षक तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय कार्यकारी समिती महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहीम जालना यांना कळविण्यात आलेले आहे. गृह विभागाने व ग्रामविकास विभागाने कोणती कार्यवाही केली आहे, याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा. याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरून अपेक्षित आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम राज्यामध्ये राबविण्याबाबत गृह विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्रमांक तंमुगां:१००८/सीआर-४३/२००८/पोल-१५, दिनांक १४ ऑगस्ट, २००८ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. सन २०१८ मधील राज्यातील १० जिल्ह्यांकडून प्राप्त अहवालाची तपासणी केली असता सदर मोहीमेतंर्गत तंटामुक्ती समितीमार्फत एकूण ६०,७९७, तंट्यापैकी १३,१६० तंटे निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक ०६ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, महात्मा गांधी तंटामुक्त अभियान, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय समित्यांच्या बैठका वेळोवेळी घेऊन आढावा घेण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत शासन निर्णयानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली आहे. त्यानुसार ती सक्षमपणे पार पाडण्यासाठी व्यापक लोकहित लक्षात घेऊन गृह विभागाने कोणती कार्यवाही केली आहे, याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा. यावर प्रधान सचिव, गृह विभाग यांनी समितीस विशद केले की, समितीचे म्हणणे आहे की, मागील काही वर्षापासून या मध्ये तेवढी गती नाही. शासन याबाबत धोरणात्मक निर्णय घेईल. सध्या शासन निर्णय आहे. आकडेवारीनुसार मागील २ वर्षामध्ये तेवढी प्रगती नाही. शासन या करिता सूचना देईल.

यावर समितीने विचारणा केली की, गावांमध्ये तंटे जसेच्या तसे आहेत. तंटा मुक्ती समिती काय करते. गावागावांमध्ये फार जास्त तंटे आहेत. यावर सहायक पोलीस महानिरीक्षक, कायदा व सुव्यवस्था यांनी समितीस विशद केले की, जे गंभीर गुन्हे आहेत, ते घेतले जात नाहीत. कंपाऊंडेबल गुन्हेच घेतले जातात. यावर समितीने विचारणा केली की, नॉन बेलेबल व नॉन कंपाऊंडेबल गुन्हे यात येणारच नाहीत. तंटे कमी करण्याकरिता सध्या ग्राम सुरक्षा दलाची स्थापना आपण करीत आहोत. यावर सहायक पोलीस महानिरीक्षक, कायदा व व्यवस्था यांनी समितीस विशद केले की, सध्याच्या माहितीनुसार १३,८९७ ठिकाणी ग्राम सुरक्षा दलाची स्थापना झालेली आहे. पुढे समितीने विचारणा केली की, एखाद्या अधिका-याने कारवाई केली नाही तर त्याच्यावर २४ तासाच्या आत कारवाई करायची आहे. एखाद्या पीआयने अवैध दारु दुकानावर कारवाई केली नाही तर त्याच्यावर २४ तासात कारवाई करायची आहे. यावर सहायक पोलीस महानिरीक्षक, कायदा व सुव्यवस्था यांनी ह्या बाबी तपासून घेण्यात येतील असे समितीस विदित केले. यावर समितीने यासंदर्भात आवश्यक त्या सुधारणा कराव्या असे निर्देशित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

गावातील शांततेचे वातावरण विकास प्रक्रियेला पोषक ठरत असते ही बाब लक्षात घेऊन शासनाने ग्रामीण भागातील तंटा-बखेड्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी महात्मा गांधी तंटामुक्त गांव अभियान १५ ऑगस्ट, २००७ पासून राज्यामध्ये सुरू करण्यात आले आहे. या माध्यामातून ठराविक पातळीवरील तंटे सामोपचाराने मिटविणे आणि विविध स्वरूपाचे उपक्रम राबवून ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्याचा प्रयत्न होत आहे.

**समितीच्या जालना जिल्ह्यातील दौ-यादरम्यान महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानअंतर्गत मोहिमेच्या अंमजबजावणीकरिता स्थापित जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय समित्यांच्या आढावा बैठका वेळोवेळी घेतल्या जात नसल्याने योजनेंतर्गत उद्दिष्टे साध्य होण्यात खीळ बसली असल्याचे, त्यामुळे गावांमध्ये तंट्याची वाढ झाली असल्याचे, पूर्णपणे दारूबंदी झाली नसल्याचे, ग्राम सुरक्षा दलाची स्थापना झाली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. यानुषंगाने सदरहू समित्यांच्या आढावा बैठका वेळोवेळी आयोजित न करण्यासंदर्भात संबंधित अधिका-यांची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय समित्यांच्या आढावा बैठका वेळोवेळी आयोजित करण्यासंदर्भात कार्यवाही व्हावी, दारूबंदी प्रत्यक्ष अंमलात आणण्याबाबत तसेच ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करण्याबाबत देखील तात्काळ कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

गृह विभागाच्या दिनांक १४ ऑगस्ट, २००८ मधील शासन निर्णयामध्ये तंटामुक्त गांव अभियानातंर्गत समित्यांचे गठन, आढावा बैठका, त्यांचे कार्यक्षेत्र तसेच कार्यपद्धतीबाबत स्पष्ट तरतुदी करण्यात आल्या असून त्याची काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याचे तसेच ही परिस्थिती केवळ जालना जिल्ह्याचीच नसून संपूर्ण राज्यात सारखीच परिस्थिती असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. सदरहू नियमामध्ये योजनेच्या अंमलबजावणीमध्ये उत्कृष्ट काम करणा-या शासकीय अधिका-यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्याबाबत तरतूद आहे. परंतु नियमातील तरतुदीची पायमल्ली करणा-या व योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कसूर करणा-या अधिका-याची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

पोलीस प्रशासन आणि योजना राबविण्यामध्ये महत्वाचे घटक असलेल्या अधिका-यांच्या उदासीनतेमुळे योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये खीळ बसली आहे. त्यामुळे योजनेत सहभागी होणा-या गावांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून योग्य जनजागृती, प्रसिद्धी व प्रचाराअभावी ग्रामीण भागात मोहिमेला ग्रामस्थांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत नसल्याने व स्थानिक पोलीस प्रशासनाच्या तसेच तालुका व जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तंटामुक्त गांव मोहीम मंदावली असल्याचे समितीचे अभिप्राय असून मागील दोन वर्षाच्या कालावधीत या योजनेमध्ये आवश्यक तेवढी प्रगती झाली नसल्याचे विभागीय सचिवांनी समिती समोरील साक्षी दरम्यान समितीच्या अभिप्रायास दुजोरा दिला आहे.

**त्यानुषंगाने राज्यामध्ये तंटामुक्त गांव अभियानाची यशस्वी अंमलबजावणी होण्याकरीता योजनेस मोठ्या प्रमाणात लोकसहभाग प्राप्त होण्याकरीता ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. राज्यस्तरीय, जिल्हा, तालुका व ग्राम स्तरावरील समित्यांच्या आढावा बैठका नियमितपणे होणे नितांत आवश्यक असून समित्यांचे एकूणच कामकाज चोखपणे चालणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता संबंधित प्रशासकीय अधिका-यांची जबाबदारीसुद्धा निश्चित करणे गरजेचे आहे. यानुषंगाने महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम राज्यामध्ये यशस्वीरीत्या राबविण्याकरीता यासंदर्भातील गृह विभागाच्या दिनांक १४ ऑगस्ट, २००८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करून आवश्यक त्या तरतुदी अंतर्भूत करण्यात याव्या तसेच नियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत कार्यवाही व्हावी, योजनेच्या अंमलबजावणी मध्ये कसूर करणा-या अधिका-यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच योजनेसंदर्भात जनजागृत, प्रसिद्धी व प्रचार याकरीता अधिक कार्यक्षमरित्या यंत्रणा राबविण्यासंदर्भात आवश्यकत्या उपाययोजना करण्यात याव्या व यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**गांवपातळीवर अलीकडील काळात महिलांच्या संदर्भातील गुन्हे, तंटे यांचे प्रमाण वाढले आहे. तसेच सोशल मिडीयाचा झालेला प्रसार, माहीती व तंत्रज्ञानांचा वापर यामुळे महिला व मुलींना याबाबतच्या वेगळ्या तंट्यांना गांवपातळीवर समोर जावे लागत आहे. यामुळे तंटामुक्त समितीस जास्तीत जास्त महिलांचा समावेश झाला तर गांवपातळीवर सामाजिक सलोखा, सौहार्द व शांतता राखण्यात मदत होणार आहे. यानुषंगाने तंटामुक्त मोहीमेमध्ये महिलांचा जास्तीत जास्त सहभाग प्राप्त करण्याकरीता कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, जालना (प्रशासन)

### अपूर्ण बंधारे पुर्ण करणेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत जालना जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, अंबड तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व पाझर तलाव अशा ५ कामांवर ६९ लाख ३७ हजार रुपये खर्च झालेले आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी किती निधी लागणार आहे, याबाबत कार्यकारी अभियंता यांनी माहिती द्यावी. यावर जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग यांनी समितीस विशद केले की, अजून २० लक्ष रुपये ही कामे पूर्ण करण्यासाठी लागणार आहेत. यावर समितीने नमुद केले की, २० लाख रुपये दिले तर ही पाचही कामे पूर्ण होतात व त्यामुळे सिंचन क्षमता वाढणार आहे. शेतक-यांच्या हिताकरिता हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. २० लाख कमी पडल्यामुळे ७० लाख रुपये वाया चालले आहेत. सदरील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व पाझर तलाव व तत्सम अपूर्ण बंधारे, त्यांचे गेट पूर्ण करणे गरजेचे आहे. मागील काही काळात शासनाकडून याकरीता निधी मिळालेला नाही, हा वरिष्ठ पातळीवर विषय आहे. परंतु आता सुधारणा झाली आहे, शासन निर्णय निघालेला आहे. आता जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधीचे नियोजन याकरीता होणार आहे. शासनाचे लाखो रुपये खर्च होऊन काही उपयोग झालेला नाही. महाराष्ट्रातील कामाचा हा विषय असल्यामुळे या विषयी समितीने सचिवांची साक्ष देखील घेतली होती. या प्रकरणी पुन्हा जलसंधारण सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

पुढे समितीने निदेश दिले की, जिल्हा परिषदेने जिल्हा नियोजन समितीकडे आवश्यक त्या रकमेची मागणी करावी व सदरहू प्रलंबित काम पूर्ण करावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

अंबड तालुक्यातील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व पाझर तलाव अशा (५) कामांवर रुपये ६९ लाख ३७ हजार एवढी रक्कम खर्च होऊनही रुपये २० लक्ष एवढा निधी आवश्यक आहे, त्यामुळे सदर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व पाझर तलाव व तत्सम अपूर्ण बंधारे पूर्ण करण्याबाबत जलसंधारण विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—

अंबड तालुका जि. जालना येथील एकूण ५ कामे अपूर्ण होती. (१) पा. त. कौचलवाडी, (२) को.प.बंधारा जामखेड, (३) को. प. बंधारा गोंदी, (४) को. प. बंधारा भनंग जळगांव, (५) को. प. बंधारा वाघलखेडा यापैकी सद्यःस्थितीत पा. त. कौचलवाडी व को. प. बंधारा, वाघलखेडा ही कामे पूर्ण झाली असून निधीअभावी देयके देणे बाकी आहे. सदरील दोन बंधा-यामध्ये पाणी अडविले जात आहे. उर्वरित ३ कामांसाठी निधी प्राप्त होताच ती कामे पूर्ण करण्यात येतील.

सदर कामे पूर्ण करणेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे दिनांक २२ डिसेंबर २०१४ रोजी, मा. सचिव नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ७ जून २०१४ व मा. उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ७ मे २०१५ रोजी पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच दिनांक ३१ जुलै २०१९ रोजी जिल्हा नियोजन समिती, जालना यांस संबंधित कामाकरिता निधी मागणी केली आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**१) मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्रायः-**जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**२) ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

सदरहू परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान चर्चा झाली नाही.

**अभिप्राय व शिफारशी**

अंबड तालुक्यातील कौचलवाडी येथील पाझर तलाव; जामखेड, गोंदी, भनंग, जळगांव, वाघलखेडा येथील कोल्हापूरी बंधा-यांच्या बांधकामासंदर्भातील कामावर अद्यापपर्यंत ६९ लक्ष ३७ हजार एवढी रक्कम खर्च करण्यात आली असून सद्यःस्थितीमध्ये कौचलवाडी येथील पाझर तलाव व वाघलखेडा येथील कोल्हापूरी बंधा-याची कामे पूर्ण झाल्याचे तसेच इतर बंधा-याचे काम पूर्ण करण्याकरीता २० लक्ष निधीची आवश्यकता

असल्याचे तसेच जिल्हा नियोजन समिती तसेच शासनाच्या नियोजन विभागाकडे सदरहू कामे पूर्ण करण्याकरिता निधी मंजूर करण्याकरीता पाठपुरावा केल्याबद्दल समिती समाधान व्यक्त करते.

**अंबड तालुका क्षेत्रातील शेतक-यांना सिंचनाचा प्रत्यक्ष लाभ मिळण्याकरिता सदरहू पाझर तलाव तसेच कोल्हापूरी बंधा-यांची उर्वरित कामे पूर्ण करण्याकरिता तातडीने आवश्यक निधीची तरतूद करून बंधा-याचे काम पूर्ण करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जालना**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(७) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१०) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोदले, अवर सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक पदाधिकारी :**

(१) श्री. अनिरूद्ध खोतकर, अध्यक्ष, जिल्हा परिषद, जालना

(२) श्री. सतिश टोपे, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, जालना

(३) श्री. रघुनाथ कौर, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, जालना

(४) श्री. दत्ता बनसोडे, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, जालना

(५) श्रीमती जिजाबाई कळंबे, सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती, जिल्हा परिषद, जालना

(६) श्री. पांडुरंग डोंगरे, संचालक, पंचायत समिती जालना

**स्थानिक निधी लेखा संचालनालय :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, मुंबई

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई :**

(१) श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. आ. शं. शेंडगे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय आयुक्त कार्यालय, जालना :**

(१) श्री. पारस बोथरा, उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

(२) श्री. अनंत कुमार, सहायक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, जालना :**

(१) श्रीमती निमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सुरेश बेदमुथा, प्रकल्प संचालक व प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शाम वाखर्डे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(५) श्री. अशोक खरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(६) श्री. पी. पी. कोकणी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(७) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. प्रविण निर्मल, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) डॉ. हणमंत गुट्टे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी व प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१०) डॉ. अमोल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. एम. एस. चौधरी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

(१४) श्री. पी. एम. खोत, उप अभियंता (यांत्रिकी)

(१५) श्री. ए. एस. फरास, जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग

(१६) श्री. हरिश्चंद्र झनझन, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. कि. बा. मराठे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१८) श्रीमती मिना रावतळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जालना

(१९) श्री. के. डी. भुतेकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर

(२०) श्री. डी. टी. भिसे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड

(२१) डॉ. एस. एस. वेणीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी

(२२) श्री. अरुण चौलवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन

(२३) श्री. राजपुत उदयसींग, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद

(२४) श्री. विलास गंगावणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर

(२५) श्रीमती एस. एल. झरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंठा

(२६) डॉ. असरार अहमद, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक), पशुसंवर्धन

समितीने जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील जालना जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जालना**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री.सुधाकर भालेराव, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(८) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(११) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोदले, अवर सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई :**

(१) श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. आ. शं. शेंडगे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद :**

(१) श्री. पारस बोथरा, उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

(२) श्री. अनंत कुमार, सहायक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, जालना :**

(१) श्रीमती निमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सुरेश बेदमुथा, प्रकल्प संचालक व प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शाम वाखर्डे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(५) श्री. अशोक खरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(६) श्री. पी. पी. कोकणी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(७) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. प्रविण निर्मल, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) डॉ. हणमंत गुट्टे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी व प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१०) डॉ. अमोल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. एम. एस. चौधरी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१४) श्री. पी. एम. खोत, उप अभियंता (यांत्रिकी)

(१५) श्री. ए. एस. फरास, जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग

(१६) श्री. हरिश्चंद्र झनझन, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. कि. बा. मराठे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१८) श्रीमती मिना रावतळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जालना

(१९) श्री. के. डी. भुतेकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर

(२०) श्री. डी. टी. भिसे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड

(२१) डॉ. एस. एस. वेणीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी

(२२) श्री. अरुण चौलवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन

(२३) श्री. राजपुत उदयसींग, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद

(२४) श्री. विलास गंगावणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर

(२५) श्रीमती एस. एल. झरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंठा

(२६) डॉ. असरार अहमद, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक), पशुसंवर्धन

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात जालना जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागह, कोल्हापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(८) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोदले, अवर सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई :**

(१) श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. आ. शं. शेंडगे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद :**

(१) श्री. पारस बोथरा, उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

(२) श्री. अनंत कुमार, सहाय्यक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, जालना :**

(१) श्रीमती निमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सुरेश बेदमुथा, प्रकल्प संचालक व प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शाम वाखर्डे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(५) श्री. अशोक खरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(६) श्री. पी. पी. कोकणी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(७) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. प्रविण निर्मल, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) डॉ. हणमंत गुट्टे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी व प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१०) डॉ. अमोल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. एम. एस. चौधरी, सिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

(१४) श्री. पी. एम. खोत, उप अभियंता (यांत्रिकी)

(१५) श्री. ए. एस. फरास, जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग

(१६) श्री. हरिश्चंद्र झनझन, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. कि. बा. मराठे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१८) श्रीमती मिना रावतळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जालना

(१९) श्री. के. डी. भुतेकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर

(२०) श्री. डी. टी. भिसे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड

(२१) डॉ. एस. एस. वेणीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी

(२२) श्री. अरुण चौलवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन

(२३) श्री. राजपुत उदयसींग, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद

(२४) श्री. विलास गंगावणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर

(२५) श्रीमती एस. एल. झरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंठा

(२६) डॉ. असरार अहमद, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक), पशुसंवर्धन

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांनी सन २०१३-१४ च्या लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालातील व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील जालना जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग

(६) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(७) श्री. राजेंद्र भागवत, सचिव, विधी व न्याय विभाग

(८) श्री. महेंद्र हजारी, सह सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(९) श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग

(१०) श्री. सं. द. सुर्यवंशी, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(११) श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(१२) श्री. विजय चौधरी, उप सचिव (पं. स.), कृषि व पणन विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद :**

श्री. पारस बोथरा, उप आयुक्त (आस्थापना)

**जिल्हा परिषद, जालना :**

(१) श्रीमती नीमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्रीमती कल्पना क्षीरसागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. एन. आर. केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) श्रीमती एम. के. धुपे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(७) श्री. आर. जी. दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्रीमती संगिता लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(९) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१३-१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, कृषी  व पणन विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव (२) (का)

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) अनुप कुमार, प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग

(५) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(६) दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(७) श्री. अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग

(८) श्री. राजेंद्र भागवत, सचिव, विधी व न्याय विभाग

(९) श्री. विनायक देशमुख, ए.आय.जी. एल. ॲण्ड ओ.

(१०) श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(११) श्री. दे. आ. गावडे, सह सचिव, ग्रामविकास विभाग

(१२) श्री. यु. ब. अजेटराव, उप सचिव, गृह विभाग

(१३) श्री. रमेश चव्हाण, उप सचिव, महसूल विभाग

(१४) डॉ. एस. एस. पंचपोर, अवर सचिव, पदुम विभाग

(१५) श्री. गणेश पवार, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(१६) श्री. ए. जी. गोटेकर, अवर सचिव, वित्त विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद :**

श्री. व्ही. एम. रसाळ, सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

श्री. के. ए. चव्हाण, सहाय्यक संचालक (लेखा) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, जालना :**

(१) श्रीमती नीमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्रीमती कल्पना क्षीरसागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. एन. आर. केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) श्रीमती एम. के. धुपे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(७) श्री. आर. जी. दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्रीमती संगिता लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(९) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१०) श्री. व्ही. आर. हरकळ, गटविकास अधिकारी, बदनापूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१३-१४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, सहाय्यक सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, ए.आय.जी.एल. ॲण्ड ओ. अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना यांची साक्ष घेतली.

## बैठकीचे कार्यवृत्त

पंचायत राज समिती (Panchayati Raj Samiti) ची बैठक बुधवार, दिनांक ०३ मार्च २०२१ रोजी ०३:०० वाजता, विसावा मजला, कक्ष क्र. २००१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव जवळगावकर पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने बैठकीत सहाव्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई